अंतरंग

महाराष्ट्रात काँग्रेस पक्षही फुटणार -आमदार शिरसाट/२

रायगड जिल्हा परिषदेत 'शासन आपल्या दारी'/५

टीम इंडियात नव्या चेहऱ्यांना संधी/८

रायगड, नवी मुंबई

राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३४९
www.ramprahar.com

शुक्रवार, ७ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

सरकार अधिक मजबूत झाले!

नाराजीच्या अफवेवर मुख्यमंत्री शिंदेंचे स्पष्टीकरण

मुंबई : प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार सत्तेत सहभागी झाल्याने राज्यातील सरकार अधिक मजबूत झाले आहे तसेच अजित पवारांच्या येण्यामुळे शिवसेनेत कुणीही नाराज नसल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे.

शिंदे-फडणवीस सरकारमध्ये राष्ट्रवादीही दाखल झाल्याने शिवसेनेतील आमदार नाराज असल्याची चर्चा होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावरून राजीनामा देणार असल्याच्याही बातम्या येत होत्या. त्यावर आता मुख्यमंत्र्यांनी स्वतः स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले की, अजित पवारांनी विकासाला साथ दिली आहे. आमच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांना सोबत घ्यायचे ठरवले. गेल्या वर्षभरात झालेल्या विकासाला

पाहून अजित पवार आमच्यात आले आहेत. त्यामुळे सरकार अधिक मजबूत झाले. आम्ही बाळासाहेबांच्या विचारावर चालणारे लोक आहोत. त्यामुळे शिवसेनेत कुणीही नाराज नाही.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, ज्या दिवसापासून या सरकारचा शपथविधी झाला त्या दिवसापासून सरकार पडणार अशा अफवा सुरू आहेत. आता तर या अफवांनी सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, परंतु या सरकारला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे पाठबळ आहे. त्यामुळे सरकारला काहीही धोका नाही.

विरोधकांनी आत्मपरीक्षण करावे!

राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्या उपमुख्यमंत्रिपदी झालेल्या शपथविधीनंतर ठाकरे गटाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला लक्ष्य केले असून त्यांच्यावर सातत्याने टीका केली जात आहे. त्या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, आपल्यावर होणाऱ्या टीकेला काहीही अर्थ नाही. विरोधकांनी पहिला आपल्या जळत्या घराकडे पाहावे, आत्मपरीक्षण करावे. गेल्या वर्षभरात जे काहरी चांगले निर्णय घेतले ते त्यांना बघवत नाही, पण लोकांना सगळे माहिती आहे.

पनवेल बसस्थानकाच्या पुनर्विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर आक्रमक

(छाया : उमेश पोद्दार)

पनवेल : रामप्रहर वृत्त

- ठेकेदाराला १५ दिवसांचा अल्टीमेटम
- प्रधान सचिव पराग जैन यांचे निर्देश

पनवेल बसस्थानक पुनर्विकासाच्या कामासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर आक्रमक झाल्याने येत्या १५ दिवसांत बसस्थानकाच्या कामाला सुरुवात न झाल्यास ठेका रद्द करण्याचे निर्देश परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन यांनी इड्युस पार्क इंटरनॅशनल कंपनीला दिले आहेत.

परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे मुख्य अभियंता श्री. गोसावी यांच्यासोबत आमदार प्रशांत ठाकूर यांची बैठक गुरुवारी (दि. ६) मंत्रालयात परिवहन विभागाचे प्रधान सचिव यांच्या दालनात झाली. या बैठकीस परिवहन महामंडळाचे वास्तुविशारद निलेश लाहिवाल, परिवहन विभागाच्या कक्ष अधिकारी श्रीमती मेंडे, ठेकेदार इड्युस पार्क इंटरनॅशनल कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुंबईचे प्रवेशद्वार व मुंबई ठाण्याहून राज्याच्या इतर भागाकडे जाणाऱ्या बसेसचे प्रमुख गंतव्य स्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पनवेल बसस्थानकाचा बांधा, वापरा, हस्तांतर करा या तत्वावर पुनर्विकास करण्याच्या कामास २०१६ साली मान्यता देण्यात आली. त्यानंतर सन २०१८मध्ये या बसस्थानकाच्या पुनर्विकासाच्या कामासाठी ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली होती, मात्र जवळपास सहा वर्षांपेक्षा जास्त कालावधी होऊनसुद्धा बसस्थानकाच्या पुनर्विकास कामास कोणत्याही प्रकारची सुरुवात झाली नाही. पुनर्विकासाच्या नावाखाली जुने बसस्थानक पाडून तात्पुरती शेड उभारण्यात आली आहे. सद्यस्थितीत तात्पुरत्या शेडमध्ये गैरसोयी असूनही नवीन बसस्थानकाच्या प्रतीक्षेने प्रवासी हा त्रास सहा वर्षे सहन करीत आहेत. बसस्थानकाच्या पुनर्विकास कामाला तातडीने सुरुवात करून पूर्णत्वास नेण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून आंदोलन, बैठका तसेच विधिमंडळातही अनेक वर्षे पाठपुरावा सुरू आहे. संबंधित विभागामार्फत अद्यापपर्यंत कार्यवाही न झाल्याने अखेर आमदार प्रशांत ठाकूर यांनी परिवहन विभागाला रायगड जिल्हा भाजपच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. त्या अनुषंगाने गुरुवारी बैठक झाली.

पनवेल बसस्थानकात प्रवासीवर्गाला होणाऱ्या त्रासाबद्दल या बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी आक्रमक भूमिका मांडत २०१८ साली इड्युस पार्क इंटरनॅशनल कंपनीला स्वीकृतीपत्र देण्यात आले असतानाही अद्यापही काम सुरू झाले नसल्याने हा ठेका रद्द व ताबडतोब नवीन ठेकेदाराची नियुक्ती करून कामाला सुरुवात करण्याची मागणी केली. **(पान २ वर..)**

मनसेकडून ठाकरे गटाला कोणताही प्रस्ताव नाही -राज ठाकरे

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील बदललेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून उद्धव ठाकरे यांना एकत्र येण्याचा प्रस्ताव देण्यात आल्याच्या चर्चांना उधाण आले होते, मात्र मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी याचे खंडन केले आहे.

शिवसेना नेते एकनाथ शिंदे व समर्थक भाजपसोबत सत्तेत गेल्यानंतर नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक बडे नेतेही या सरकारमध्ये सहभागी झाले आहेत. त्यामुळे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एकत्र यावे, अशी भूमिका काही कार्यकर्ते मांडत आहेत. तशा आशयाचे बॅनर्सही झळकले. अशातच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि मनसेचे नेते अभिजीत पानसे यांनी एका गाडीतून प्रवास केला. त्यानंतर राऊत 'मातोश्री'वर आणि पानसे 'शिवतीर्थ'वर गेले आणि पुन्हा चर्चेला उधाण आले, मात्र यावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ठाकरे गटाला कोणताही प्रस्ताव देण्यात आलेला नाही, असे स्पष्ट केले.

'ठाकरे गटाचे आमदार संपर्कात'

मुंबई : उद्धव ठाकरे गटातील सहा आमदार आमच्या संपर्कात आहेत. काल माझी चर्चादेखील झाली आहे. ते म्हणतात मुंबईच्या बाहेर भेटूया, असे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे.

ना. सामंत म्हणाले की, शिवसेनेत नाराजी असल्याच्या केवळ अफवा आहेत. आमच्यात मंत्रिपदावरून कोणतीही वादावादी झाली नाही व होणार नाही. कोणीतरी सांगितले की सहा ते सात आमदार उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत जाणार आहेत, मात्र ही गोष्ट खरी नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन जात आहेत. त्यामुळे ठाकरे गटातील आमदारच आमच्यासोबत यायला तयार आहेत.

उद्धव ठाकरे भूमिका स्पष्ट करा; अन्यथा आम्ही निर्णय घेणार!

प्रकाश आंबेडकर यांचा इशारा

अकोला : प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीच्या महाविकास आघाडीतील समावेशाबद्दल उद्धव ठाकरेंनी पुढच्या १५ दिवसांत भूमिका स्पष्ट करावी, अन्यथा आम्ही आमचे निर्णय घ्यायला मोकळे आहोत, असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी दिला आहे. ते गुरुवारी (दि. ६) अकोल्यात बोलत होते.

वंचितच्या महाविकास आघाडीतील समावेशाबद्दल उद्धव ठाकरेंनी पुढच्या १५ दिवसांत परिस्थिती स्पष्ट करावी. त्यांचे काँग्रेस आणि राष्ट्रवादीशी या संदर्भात काय बोलणे झाले आहे, हे स्पष्ट करावे. आता निवडणुका जवळ येत आहेत. उद्धव ठाकरेंनी आता न्यायालयीन लढाईच्या पुढे जात भविष्याच्या दृष्टीने निर्णय घेण्याची वेळ आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले. दरम्यान, आंबेडकरांनी अजित पवार जे ओठात तेच पोटात असणारा नेता असल्याचे म्हणत त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली आहेत.

निवडक

राष्ट्रगीताचा अपमान करणाऱ्यांना अटक

श्रीनगर : काश्मीरचे लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांच्या उपस्थितीत जूनमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात राष्ट्रगीताला उभे न राहता १४ जणांनी अपमान केला होता. या प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या सर्वांना मध्यवर्ती कारागृहात पाठवण्यात आले आहे.

बीएसईकडून शेअर बायबॅकची घोषणा

मुंबई : भारतातील आघाडीचा बाजारमंच असलेल्या मुंबई शेअर बाजार अर्थात बीएसईने समभाग पुनर्खरेदीची (बायबॅक) गुरुवारी घोषणा केली. बीएसईने निविदा मार्गाने (टेंडर रूट) ३७५ कोटी रुपये मूल्याच्या समभागांच्या पुनर्खरेदीची मंजुरी दिली. प्रत्येकी ८१६ रुपये किमतीला ही पुनर्खरेदी केली जाणार आहे.

रायगडचे पर्जन्यमान

२४ तासांतील पाऊस : १३.३ मिमी
एकूण पाऊस : ७४४.१ मिमी

रिलायन्स इथेन गॅस प्रकल्पग्रस्तांच्या न्यायासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतली पालकमंत्र्यांची भेट

■ ना. उदय सामंत यांनी रिलायन्स व्यवस्थापनाला ठणकावले

प्रकरण मार्गी लावा; अन्यथा तुम्हाला मार्गी लावू!

मुंबई : प्रतिनिधी

कर्जत तालुक्यातील रिलायन्स इथेन गॅस प्रकल्पग्रस्त शेतकरी आपल्या जमिनीच्या मोबदल्यासाठी विविध स्तरावर पाठपुरावा करीत असून अनेक आंदोलने, उपोषणे करून या अन्यायग्रस्त शेतकऱ्यांचा लढा सुरू आहे. या संदर्भात भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने गुरुवारी (दि. ६) रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या मुंबईतील शासकीय निवासस्थानी रिलायन्स कंपनी अधिकारी आणि शेतकरी यांच्यात बैठक आयोजित

करण्यात आली होती. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी कशा प्रकारे कंपनीने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे याबाबत पालकमंत्र्यांना सविस्तर माहिती दिली व या विषयी न्याय मिळावा, अशी विनंती केली. याची दखल घेत पालकमंत्र्यांनी रिलायन्स व्यवस्थापनाला ठणकावले आहे.

या बैठकीला रायगडचे जिल्हाधिकारी, कर्जतचे तहसीलदार, रिलायन्स इथेन गॅस प्रकल्पाचे अधिकारी अनिल सावंत, रिलायन्स कंपनीचे अधिकारी हितेन रॉय, कुमारवेल यांच्यासह कर्जत येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारे भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, चिटणीस राजेश भगत, विधानसभा प्रमुख किरण ठाकरे, केशव तरे तसेच शेतकरी रमेश कालेकर, सुरेश खाडे, रघुनाथ तरे, गणेश तरे, उमेश राणे आदी उपस्थित होते.

या प्रकल्पात कशा प्रकारे फसवणूक करण्यात आली याबाबत शेतकऱ्यांनी पालकमंत्र्यांसमोर यादीच बैठकीत मांडली. यावर पालकमंत्री यांनी तातडीने जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक बोलावून कंपनीने जमीन कशी अधिग्रहित केली याचा अहवाल मागवला आहे तसेच आमची बांधिलकी शेतकऱ्यांशी असून त्यांना न्याय मिळवून देणे हे कर्तव्य असल्याने कंपनी शेतकऱ्यांना न्याय देणार नसेल, तर कंपनी व्यवस्थापनाची हयगय न करता शासकीय नियमावलीनुसार त्यांना वठणीवर आणल्याशिवाय राहणार नाही, असे स्पष्ट करीत प्रकल्पाची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

वीज समस्यांसंदर्भात उद्या खांदा कॉलनीत बैठक

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल तालुक्यातील विद्युत पुरवठ्यासंदर्भातील वाढत्या तक्रारी



लक्षात घेता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार तसेच त्यांच्या आणि विद्युत मंडळाचे अधीक्षक अभियंता यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ८) दुपारी ३ वाजता खांदा कॉलनीतील श्रीकृपा हॉलमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली आहे.

वीजपुरवठा व त्या अनुषंगाने तक्रारी लक्षात घेता त्याचे निवारण होण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बैठकीस येताना वीज ग्राहकांनी, विविध सोसायट्यांनी केलेल्या तक्रारींचा अर्ज तसेच लेखी स्वरूपात समस्या लिहून सोबत घेऊन वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे.

'इस्रो'कडून चांद्रयान-३चे १४ जुलैला होणार प्रक्षेपण

श्रीहरिकोटा : वृत्तसंस्था

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच 'इस्रो'ने चांद्रयान-३ लाँच व्हेइकल रॉकेटसोबत जोडले आहे. या महत्त्वाकांक्षी मोहिमेची तयारी अंतिम टप्प्यात असून १४ जुलै रोजी दुपारी २.३५ वाजता चांद्रयान-३ प्रक्षेपित करण्यात येणार आहे.

इस्रोने ट्वीट करीत दिलेल्या माहितीनुसार चांद्रयान-३चा भाग बुधवारी लाँच व्हेईकल मार्क (एलव्हीएम) ३ रॉकेटशी जोडण्यात आला. हे रॉकेट इस्रोनेच विकसित केले आहे. आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन स्पेस सेंटरमधून चांद्रयान प्रक्षेपित करण्यात येईल. प्रॉपेलंट मॉड्यूल 'लँडर' आणि 'रोव्हर'ला चंद्राभोवती १०० किमीच्या कक्षेत नेईल आणि यान अलगदपणे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरेल. हे यान तेथील वातावरण आणि परिस्थितीचा अभ्यास करेल.

कोयता गँगच्या म्होरक्याची धिंड

पुणे : प्रतिनिधी

पुण्यातील कोंढवा परिसरात कोयत्याचा वापर करून दहशत माजविणारा सराईत गुंड मंगेश उर्फ मंग्या याच्या पोलिसांनी मुसक्या आवळून त्याची धिंड काढली. याच्याविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) गुन्हे दाखल होते.

गुंड मंगेश उर्फ मंग्या हा 'एस. एम. गँग' नावाची टोळी तयार करून कोंढवा परिसरात दहशत माजवत होता. माने व त्याच्या साथीदारांनी २७ मार्च रोजी रोहित खंडाळे याच्यावर कोंढव्यातील साईनगर परिसरात कोयत्याने वार केले होते. गुन्हा केल्यानंतर माने पसार झाला होता. त्याच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली, पण तो गेले तीन महिने पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर सापळा लावून मानेला पकडण्यात आले.

(सविस्तर वृत्त पान २ वर..)

पनवेल देवद येथे विविध विकासकामांचा शुभारंभ

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

पनवेल : रामप्रहर वृत्त

जल जीवन मिशन योजनेंतर्गत पनवेल तालुक्यातील देवद येथे नवीन पिण्याच्या पाण्याची टाकी अणि नळ पाणीपुरवठा योजनेसाठी ९० लाख रुपये मंजूर झाले आहेत. या कामाचे तसेच भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक ग्रामविकास निधीतून साकारण्यात येणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन गुरुवारी (दि. ६) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी बोलताना त्यांनी राज्यातील सरकार हे सर्वसामान्यांच्या हिताचे काळजी घेणारे सरकार असून याचा आम्हाला अभिमान आहे, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, माज पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे, सरपंच शीतल सोनावणे, उपसरपंच प्रभाकर सोनावणे, माजी उपसरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्य विनोद वाघमारे, दिनेश वाघमारे, सदस्य

निलेश जुवेकर, करुणा वाघमारे, संतोष वाघमारे, राजेश पाटील, वामन वाघमारे, सुरेश वाघमारे, रामभाऊ वाघमारे, प्रवीण वाघमारे, राजेंद्र ठोकळ, मंगेश वाघमारे, संदीप वाघमारे, विजय वाघमारे, निलेश वाघमारे, पद्माकर वाघमारे, शशिकांत वाघमारे, गणेश वाघमारे, अरुण वाघमारे, योगेश बनकर, गोरख, महावीर पांडे, भूपेंद्र पाटील, दिवेश भगत, राम वाघमारे, अनंता वाघमारे, भगवान भंडारे, किरण धुरेंदर, वृषाली वाघमारे, निनाद गाडगीळ, राहुल पाटील, जितेंद्र वाघमारे, ठेकेदार मयुर कदम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी देशहिताच्या दृष्टीने अनेक महत्त्वाची पावले उचलत आहेत. त्यांच्या संकल्पनेतून हर घर नल हर घर जल ही पाण्याची योजना साकारली जात आहे. या योजनेंतर्गत देवद ग्रामपंचायतीसाठी ९० लाख रुपये मंजूर झाले आहेत. **(पान २ वर..)**

शासकीय शेतजमिनीवर प्रकल्पांचा आराखडा तयार करा

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे निर्देश

मुंबई : प्रतिनिधी

राज्य शेती महामंडळाकडे मोठ्या प्रमाणात शेत जमिनी आहेत. या जमिनींची मोजणी तीन महिन्यांत रोव्हर्सद्वारे करावी. महामार्ग, रस्त्यांची सुविधा असेल त्या राज्य शेती महामंडळाच्या जमिनीवर लॉजिस्टिक पार्क, ड्राय पोर्ट उभे करण्यासाठी तज्ज्ञ कंपन्यांमार्फत आराखडा तयार करण्याच्या सूचना महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केल्या.

राज्य शेती महामंडळाच्या संचालक मंडळाच्या ३१८व्या बैठकीत मंत्री विखे पाटील बोलत होते. बैठकीला महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, शेती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजित माने, लाभक्षेत्र विकासचे सचिव संजय बेलसरे, सहकार आयुक्त अनिल कवडे, साखर आयुक्त पुलकुंडवार, नाशिक विभाग पाटबंधारे विभागाचे मुख्य अभियंता मिसाळ हे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, अहमदनगर येथील शेती महामंडळाच्या जमिनीमधून महामंडळाला उत्पन्न घ्यावयाचे आहे. तेथे विकास होण्यासाठी लॉजिस्टिक पार्क, ड्राय पोर्ट, औद्योगिक पार्क उभारण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी लवकर आराखडा तयार करण्यासाठी शासकीय कंपन्यांची बैठक येत्या आठवड्यात घ्यावी. मोजणीसाठी ड्रोनऐवजी आधुनिक रोव्हर्सचा वापर करावा. रोव्हर्स कमी पडत असतील, तर आणखी घेऊन झिरो पेन्डन्सी करावी.

या वेळी सार्वजनिक उपक्रम, प्रधानमंत्री आवास योजना, सरकारी योजना, गावठाण विस्तार आदी वापरासाठी शेती महामंडळाची जमीन देण्यासाठी मंत्रिमंडळाची मंजुरी घेवून काही अटी-शर्तीच्या अधिन राहून देण्यास मान्यता देण्यात आली. महामंडळाच्या कामगारांना कामगार कायद्यानुसार ८.३३ टक्क्यांप्रमाणे बोनस देण्यासही मान्यता देण्यात आली.

पुणे येथील शेती महामंडळाच्या मुख्य इमारतीच्या जागेचा वाणिज्यिक वापर करण्यासाठी पुनर्विकास करण्यात येणार आहे. यासाठी नगरविकास विभागाला प्रस्ताव पाठवावा, कार्यालय वापर, इतर व्यावसायिक वापरासाठी अटी व शर्ती बिनचूक कराव्यात. पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या धर्तीवर प्रस्ताव पाठवून त्यासाठी तज्ज्ञ वास्तूविशारद नियुक्त करावा. या इमारतीमध्ये मोठे कार्यक्रम, इव्हेंट घेण्यासाठी व्यावसायिक वापर करता यावा, यादृष्टीने इमारतीचे मॉडेल तयार करावे, अशा सूचना मंत्री विखे-पाटील यांनी दिल्या.

खंडकरी शेतकऱ्यांना जमीन देण्यासाठी नियमात बदल करून एक गुंठा ते २० गुंठे आणि २० ते ४० गुंठे या पद्धतीने याद्या तयार कराव्यात. त्यांना जमिनीचा लाभ देण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. महामंडळाच्या जमिनीमध्ये विहीर घेण्यासाठी परवाना घेणे बंधनकारक असून भाडेतत्त्वावर जमिनी देताना वापरमूल्य आणि त्यावर जीएसटी लावण्याबाबत मान्यता देण्यात आली. ई-करार नियमावलीमध्ये दुरुस्ती करून अटी व शर्तीचा भंग करणाऱ्यांना नोटीसा देण्याचाही ठराव करण्यात आला. खंडकऱ्यांच्या जमिनीवरील शर्त कमी करण्याबाबत चर्चा झाली.

शेतकऱ्यांना जमिनी देताना ज्यांची वर्ग १मधून घेतली त्यांना त्याच पद्धतीने विनामोबदला देणे, वर्ग २च्या बाबतीत मोबदला घेऊन जमीन देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. या वेळी राज्य शेती महामंडळ मर्यादितऐवजी महाराष्ट्र राज्य शेती प्राधिकरण या नावाने स्वतंत्र प्राधिकरण करण्याबाबत चर्चा करण्यात आली. डॉ. देवरा यांनी विविध सूचना केल्या, तर माने आणि महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रुपाली आवले-डंबे यांनी सादरीकरण केले.

महाराष्ट्रात काँग्रेसही फुटणार

शिवसेना नेते आमदार शिरसाट यांचा दावा

मुंबई : प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्यासह जवळपास ४० आमदारांनी शिंदे-फडणवीस सरकारला पाठिंबा दिला आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला खिंडार पडले आहे. ही घटना ताजी असताना महाराष्ट्रात काँग्रेस फुटून आणखी एक राजकीय भूकंप होणार असल्याचे शिवसेना आमदार संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रात आणखी एक गट सत्तेत येईल. काँग्रेसचे १६ ते १७ आमदार संपर्कात आहेत, असे आमदार शिरसाट म्हणाले. ते 'टीव्ही ९ मराठी'शी बोलत होते. यामध्ये किती तथ्य आहे? असे विचारले असता त्यांनी, काँग्रेस पक्ष फुटणार आहे हे नक्की आहे. राज्याच्या मंत्रिमंडळाचा विस्तारही लवकर होणार आहे. त्यामध्ये शिवसेना आणि भाजपच्या आमदारांना मंत्रिपदे दिली जातील, हेही तेवढेच सत्य आहे, असे सांगितले. काँग्रेस कधी फुटतेय आणि ते कधी सत्तेत येतात? यासाठी थोडी वाट पाहावी लागेल, पण काँग्रेस फुटणार आहे हे नक्की आहे, असे आमदार शिरसाट म्हणाले. त्यामुळे पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे.

गणेशमूर्तिकारांना आजपासून मंडप परवानगी

मुंबई : गणेशोत्सव जवळ आला असून मूर्तिकारांना मंडप उभारण्यासाठी परवानगी देण्याची प्रक्रिया शुक्रवार (दि. ७)पासून सुरू करण्यात येणार आहे. पर्यावरणपूरक शाडूच्या मातीपासून लहान-मोठ्या, तसेच पीओपीपासून चार फुटांहून अधिक उंच गणेशमूर्ती घडविणाऱ्या मूर्तिकारांना कार्यशाळांच्या मंडपासाठी, त्याचबरोबर मूर्ती साठवणुकदारांना मंडप परवानगी देण्यासाठी शुक्रवारी सकाळी ११ वाजल्यापासून एक खिडकी सुविधा सुरू करण्यात येणार आहे. पोलीस, वाहतूक पोलीस व अग्निशमन दल या सर्व यंत्रणांच्या प्रक्रिया एकाच ठिकाणी होणार आहेत.

कोयता गँगच्या म्होरक्याची कोंढव्यात पोलिसांकडून धिंड

पुणे : प्रतिनिधी

कोंढवा-अप्पर इंदिरानगर परिसरात एकावर हल्ला करून पसार झालेला सराईत गुंड मंगेश माने याची कोंढवा पोलिसांनी धिंड काढली. माने याने एस. एम. गँग नावाची टोळी सुरू करून दहशत माजविली होती. त्याच्याविरुद्ध पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई केली होती.

मंगेश उर्फ मंग्या अनिल माने (वय २६, रा. सरगम चाळ, अप्पर इंदिरानगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. २७ मार्च रोजी माने व त्याच्या साथीदारांनी रोहित खंडाळे याच्यावर कोंढव्यातील साईनगर परिसरात कोयत्याने वार केले होते. या प्रकरणी मंगेश माने, सागर जाधव, पवन राठोड, सूरज पाटील, अभिजीत दुधणीकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा केल्यानंतर माने पसार झाला होता. मानेच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली

होती, पण तो गेले तीन महिने तो पोलिसांना गुंगारा देत होता.

कोंढव्यातील पाण्याच्या टाकीजवळ माने थांबल्याची माहिती पोलीस कर्मचारी सूरज शुक्ला आणि सुजित मदने यांना मिळाली होती. पोलिसांनी सापळा लावून मानेला पकडले. त्यानंतर मानेची कोंढवा-अप्पर इंदिरानगर परिसरातून पोलिसांनी धिंड काढली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, गुन्हे शाखेचे निरीक्षक संजय मोगले, संदीप भोसले, उपनिरीक्षक स्वप्नील पाटील, सतीश चव्हाण, निलेश देसाई, गोरखनाथ चिनके, ज्योतीबा पवार आदींनी ही कारवाई केली.

रस्त्यात सापडलेला महागडा फोन केला प्रामाणिकपणे परत

पनवेल : वार्ताहर

रस्त्यात सापडलेला महागडा फोन प्रामाणिक इसमाने पोलिसांकडे जमा करून हरवलेल्या व्यक्तीकडे सुपूर्द केला. याबद्दल सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

प्रकाश मघाडे याचा महागडा आयफोन नवीन पनवेल परिसरातील सिंडिकेट बँकेजवळ हरवला होता. हा मोबाइल सुकापूर येथील रोहित भोसले याला सापडला. त्याने आपला प्रामाणिकपणा जपत तो मोबाइल खांदेश्वर पोलिसांकडे दिला. खांदेश्वर पोलिसांनी तत्काळ त्या मोबाईलच्या मालकाबरोबर संपर्क साधून त्याचा हरवलेला मोबाईल खांदेश्वर पोलिसांकडे असल्याचे सांगितले.

प्रकाश मघाडे हे खान्देश्वर पोलीस ठाण्यात आल्यानंतर पोलिस हवालदार जयंत यादव यांच्या समक्ष रोहित याने प्रकाश याला मोबाइल परत केला. त्याच्या या प्रामाणिकतेबद्दल खांदेश्वर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत लांडगे यांनी रोहित भोसले यांचा सत्कार केला.

जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांची गणपती कारखान्यांना सदिच्छा भेट

पेण : प्रतिनिधी

गणेशमूर्तींचे माहेरघर असणाऱ्या पेण तालुक्यातील हमरापूर येथील गणपती कारखान्यांना जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी रविवारी सदिच्छा भेट दिली. त्यांच्यासमवेत पेण प्रांताधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे व महसूल प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. मूर्तीकार संघटनेचे कुणाल पाटील, राजन पाटील, कैलास पाटील, अभय म्हात्रे, नितीन मोकल यांच्यासह इतर त्यांनी मूर्तीकारांशी संवाद साधला.

पेणमध्ये गणेशमूर्ती तयार करण्याची १०० ते १२५ वर्षांपूर्वीची ही मुर्तीकला उत्तरोत्तर अधिक वृद्धिंगत झाली. १९९०साली पदवीधर तरुण वर्गाने हा व्यवसाय सुरू केला आणि बघता बघता गेल्या तीन दशकांत हे कलाविश्व विस्तारले. जागेवर मार्केट उपलब्ध झाल्याने या ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आणि हजारो लोकांना घरच्या घरी रोजगार मिळाला आहे. हमरापूर विभागातील १२०० कारखान्यांत गणेशमूर्तींची निर्मिती होत असते. गणेशमूर्तींचे वितरण देशात व परदेशात होते.

हमरापूर विभागातील गणेशमूर्ती कार्यशाळांना जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी सदिच्छा भेट देऊन मूर्तिकार संघटनेच्या पदाधिकारी व मूर्तीकारांशी संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेतल्या. जागेचा अभाव ही मोठी समस्या असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत वरिष्ठ अधिकारी वर्गाशी शासकिय जागा उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न करणार असे मूर्तिकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी आश्वासन दिले आहे.

भाल विठ्ठलवाडी खारभूमी योजनेतील ढासळलेला बंधारा व त्यांचे युद्धपातळीवर सुरू असलेले कामाची पाणी आणि बाळगंगा धरण प्रकल्प साईटवर जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी भेट दिली.

महिलांना एलईडी बल्ब बनविण्यासाठी मशीन भेट

पेण : रामप्रहर वृत्त

ग्रुप ग्रामपंचायत दुष्मी खारपाडामार्फत १५वा वित्त आयोगमधून ग्रामपंचायत हद्दीतील महिला बचत गटांना एलईडी बल्ब बनविण्याचे प्रशिक्षण क्षितिज मल्टी संस्थेकडून देण्यात आले.

महिला सक्षमीकरणासाठी सरपंच रश्मी भगत व सर्व सदस्यांनी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना ग्रामपंचायत १५ टक्के निधीतून एलईडी बल्ब बनविण्यासाठी दोन मशीन देण्यात आले. या वेळी सरपंच रश्मी भगत, उपसरपंच मच्छिंद्र सवार, सदस्य हासुराम ठाकूर, नितेश घरत, अरुणा पाटील, मीनाक्षी घरत, सुप्रिया पाटेकर, सुजाता ठाकुर, श्वेता देसले, संजय घरत, प्रशांत घरत, ग्रामसेविका अर्चना थळे, वत्सला मोकल, मन्या पाटील आदी उपस्थित होते.

फुंडे हायस्कूलमध्ये वीर वाजेकर जयंती

उरण : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे गुरुवारी (दि. ६) महालन विभागाचे शिक्षण महर्षी आणि फुंडे शैक्षणिक संकुलाचे संस्थापक वीर वाजेकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

विद्यालयाचे प्राचार्य म्हात्रे, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, कार्यालय प्रमुख एम.पी. तुमडे, वीर वाजेकर यांचे नातू प्रदीप पाटील, मंगेश वाजेकर आणि सर्व शिक्षक वृंदाचे हस्ते वीर वाजेकरांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

या वेळी उपशिक्षिका दर्शना माळी यांनी विद्यार्थ्यांना वाजेकरांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची माहिती सांगितली.

चतुर्थीनिमित्त अष्टविनायक क्षेत्र महड येथे भाविकांची गर्दी

खोपोली : प्रतिनिधी

संकष्ट चतुर्थीनिमित्त गुरुवारी (दि. ६) खालापूर तालुक्यातील महड अष्टविनायक क्षेत्र येथे वरदविनायकाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. सकाळपासूनच लागलेल्या भाविकांची रांग उशीरापर्यंत कायम होती.

दर्शनासाठी आलेल्या भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून श्रीक्षेत्र महड देवस्थान व्यवस्थापन कमिटी कार्यवाह मोहिनी वैद्य व केदार जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली देवस्थान व्यवस्थापन कमिटीचे राजेंद्र बडगुजर यांनी व स्थानिक नागरिकांनी आपआपल्या स्तरावर सोयीसुविधा उपलब्ध केल्याचे दिसले. मंदिर परिसर व महड फाटा येथे पोलीस निरिक्षक बाळा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी प्रशासनाने चोख व्यवस्था ठेवली होती.

पान १ वरून

पनवेल बसस्थानकाच्या पुनर्विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर आक्रमक

नव्या बांधकाम नियमावलीमुळे (यूडीसीपीआर) अतिरिक्त बांधकाम करावे लागत असल्याने आर्थिक नुकसान होत असल्याची तक्रार ठेकेदाराने केली. त्यावर या संदर्भामध्ये नियमांचे पालन करूनच काम करावे, लागेल असे निर्देश ठेकेदाराला प्रधान सचिव सचिव पराग जैन यांनी दिले. त्या अनुषंगाने जैन यांनी तातडीने कार्यवाही होण्यासाठी येत्या १५ दिवसांचा अल्टीमेटम संबंधित ठेकेदार इड्युस पार्क इंटरनॅशनल कंपनीला दिला आहे.

पनवेल एसटी बसस्थानकाचा वापर सर्वसामान्य गोरगरीब माणूस दैनंदिन कामासाठी करीत असून त्याला अनेक हाल अपेष्टांना सामोरे जावे लागत आहे. या संदर्भामध्ये ठेकेदाराला यापुढे एकही दिवसाची मुदत देऊ नये, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केली. ही मागणी प्रधान सचिव पराग जैन यांनी मान्य केली असून पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनाही या कंत्राटाचे आराखडे मंजूर करण्यासंदर्भात सूचना केल्या असल्याचे नमूद केले. त्यामुळे या महत्त्वपूर्ण बैठकीमुळे आता बसस्थानकाच्या पुनर्विकासाच्या कामाला लवकरच सुरुवात होईल अशा अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.

पनवेल देवद येथे विविध विकासकामांचा शुभारंभ

या निधीतून पाण्याचे वितरण तसेच पंपिंगचे काम करण्यात येणार असून लवकरच पाण्याच्या टाकीचाही समावेश केला जाणार आहे. या कामाचे तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक ग्रामविकासच्या १० लाख रुपयांच्या निधीतून देवद येथील साक्षीनगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या सर्व कामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

राष्ट्रपती सिध्दिविनायक चरणी

मुंबई : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी राज्यपाल रमेश बैस, श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास समितीचे अध्यक्ष आदेश बांदेकर, विश्वस्त, न्यास समितीच्या कार्यकारी अधिकारी नंदा राऊत, राष्ट्रपती कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंदिर न्यास समितीतर्फे गणपतीची मूर्ती भेट देऊन राष्ट्रपतींचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले.

मोबाइल चोरीच्या घटनांमध्ये वाढ

पनवेल : रेल्वे प्रवासामध्ये मोबाइल चोरीच्या घटना वाढल्या आहेत. रेल्वे प्रवासात भारतीय सैन्य दलामधील जवानाचा मोबाईल चोरट्यांनी पळवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सैन्य दलात कार्यरत असलेला ऋतुराज कदम हा तरुण सांगली येथील आपल्या घरी जाण्यासाठी निजामुद्दीन रेल्वे स्टेशनवरून पनवेलला येणाऱ्या एक्स्प्रेसने प्रवास करत होता, मात्र या प्रवासादरम्यान चोरट्यांनी त्यांच्या खिशातील ६४ हजार रुपये किमतीचा मोबाइल चोरी करून नेला.

दुखवटा

निर्मला भट

खोपोली : खोपोलीतील वृत्तपत्र व्यावसायिक सुधाकर व प्रभाकर भट यांच्या मातोश्री निर्मला अनंत भट (वय ८५) यांचे वृद्धत्वाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

निर्मला भट यांची खानावळ होती. एक उत्तम अन्नपूर्णा म्हणून त्यांची परिसरात ओळख होती. त्यांच्या अंत्ययात्रेला विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते. ब्राह्मण सभा खोपोली व राष्टीय स्वयंसेक संघ यांच्यातर्फे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

झोपडपट्टीधारकांचे होणार पुनर्वसन

पनवेल महापालिका बांधणार अडीच हजार घरे

पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पनवेल महापालिकेच्या वतीने दोन हजार ६०० घरे बांधण्यात येणार आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात पटेल मोहल्ला, कच्छी मोहल्ला याठिकाणी इमारती बांधण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेच्या वतीने झोपड्या रिकाम्या करण्यासाठी झोपडीधारकांना नोटिसा देण्यात आल्या, मात्र पटेल मोहल्ला, कच्छी मोहल्ला येथील जनहित कल्याणकारी सोसासटीच्या वतीने महापालिकेच्या विरोधात मुंबई येथील उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केली होती. उच्च न्यायालयाने झोपडपट्टीधारकांना ३० सप्टेंबर २०२३पर्यंत झोपडी रिक्त करावी असे आदेश दिले आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत शासन निर्णय ९ डिसेंबर २०१५, नुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी योजनांमध्ये 'सर्वांसाठी घरे २०२२'ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेनूसार आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिका हद्दीतील झोपडीधारकांना पक्की घरे बांधून दिली जाणार आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील वाल्मिकी नगर, महाकाली नगर, लक्ष्मी वसाहत, कच्छी मोहल्ला, पटेल मोहल्ला, अशोकबाग, तक्का वसाहत या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत पालिका हद्दीत दोन हजार ६०० घरे बांधण्यात येणार आहे. यामध्ये लाभार्थ्याला ३० चौरस मीटरचे घर मिळणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पनवेल महापालिकेतील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या ०६ सविस्तर प्रकल्प अहवालास केंद्र व राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे.

या योजनेमुळे पनवेल महापालिका झोपडपट्टी मुक्त होण्यास मदत होणार आहे, तसेच झोपडपट्टीधारकास इमारतीमध्ये स्वतःच्या हक्काचे घर मिळणार आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात कच्छी मोहल्ला, पटेल मोहल्ला याठिकाणी १४ इमारती बांधण्यात येणार आहे. यासाठी या परिसरातील ९३९ झोपडीधारकांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत. नवीन घरांचे बांधकाम होईपर्यंत निवासाची व्यवस्था करण्यासाठी भाड्यापोटी झोपडपट्टीवासियांना चार हजार रुपये दिले जाणार आहेत, मात्र येथील जनहित कल्याणकारी सोसासटीच्या वतीने महापालिकेविरोधात मुंबई येथील उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केली होती.

झोपडी रिक्त करण्याचे न्यायालयाचे आदेश

२६ जून रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने झोपडपट्टीवासियांना ३० सप्टेंबरपर्यंत झोपडी रिक्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत, तसेच सुनावणी तारखेपासून १५ दिवसांमध्ये महापालिकेस हमीपत्र सादर करण्याच्या सूचना उच्च न्यायालयाने दिल्यात. हमीपत्र सादर न केल्यास मनपाकडून झोपडी रिक्त करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे, अशी माहिती उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली.

(छाया : प्रफुल्ल कांबळे)

रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

पनवेल : रामप्रहर वृत्त

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक जिल्हा वार्षिक योजना निधीतून मोर्बे ते कोंडले, मोर्बे तलाव ते करंबेलीतर्फे तळोजा रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ६) झाले.

पनवेल विधानसभा मतदारसंघात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विकासाची कामे मार्गी लागत आहेत. त्यानुसार त्यांच्या स्थानिक जिल्हा वार्षिक योजना निधीमधून मोर्बे ते कोंडले, मोर्बे तलाव ते करंबेलीतर्फे तळोजा रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या रस्त्याच्या कामासाठी ४० लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार आहे. या विकासकामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी झाले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, ओ बी सी सेल रायगड जिल्हा एकनाथ देशेकर, पंचायत समितीचे माजी सदस्य भुपेंद्र पाटील, खैरवाडीचे संरपंच मंगल्या वारगडा, जनार्दन कोंळबेकर, रवींद्र पाटील, परशुराम नावडेकर, बाळाराम उसाटकर, रामदास म्हात्रे, दिनेश फडके, एकनाथ नाईक, भालचंद्र सिनारे, लक्ष्मण पाटील, दिपक बोडे, लहु मुंढे, पिंटु म्हात्रे, रमेश नावडेकर, चांगु चौधरी, पांडुरंग भगत, बापू चौधरी, मंगेश चौधरी, बबन भगत, ठेकेदार मयुर कदम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

चिंचवली येथील शाळेत वह्यावाटप

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे उपक्रम

पनवेल : रामप्रहर वृत्त

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने तसेच स्वर्गीय दशरथ पुंडलिक शेळके यांच्या १८व्या पुण्यस्मरणानिमित्त चिंचवली येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत वह्यावाटपाचा कार्यक्रम गुरुवारी (दि. ६) आयोजित करण्यात आला होता. या वेळी भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले असून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने गेल्या तीन दशकांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवून गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना नेहमीच मदत केली जात आहे. त्या अंतर्गत श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने तसेच स्व. दशरथ पुंडलिक शेळके १८व्या पुण्यस्मरणानिमित्त चिंचवली येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, रमेश पाटील, अविनाश शेळके, सुनील शेळके आदी पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

शिवाजीनगर येथे ज्येष्ठ नागरिकांना छत्रीवाटप

पनवेल : रामप्रहर वृत्त

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळांच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबवून गरजूंना मदत करण्यात येते. त्याअंतर्गत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्षाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांना छत्रीवाटप कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी (दि. ६) करण्यात आले होते.

हा कार्यक्रम पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथे आयोजित करण्यात आला असून भाजप महिला मोर्चाच्या पनवेल तालुकाध्यक्षा तथा पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत यांच्या हस्ते छत्र्यांचे वाटप ज्येष्ठ नागरिकांना करण्यात आले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, भाजपचे शिवाजीनगर उपाध्यक्ष व्ही. के. ठाकूर, ज्येष्ठ नेते पी. के. ठाकूर, किशोर ठाकूर, भास्कर पाटील, तुकाराम मोकल, गजानन ठाकूर, महिला मोर्चाच्या तालुका चिटणीस नंदा ठाकूर, आशा म्हात्रे, मंजुळा कडु, भागिरथी मोकल, रशिक कानडा, जितेंद्र कडु, राजेश म्हात्रे, शशिकांत ठाकूर, गजानन गोंधळी आदी उपस्थित होते.

पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून पनवेल महापालिकेच्या कोळीवाडा येथील शाळेत माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी मुख्याध्यापक दशरथ म्हात्रे सर, हरिश्चंद्र भगत, प्रमोद कोळी, उपशिक्षिका योगिता पाटील, आशा राणा, सिमरन शिलवंत, रूपाली भिलारे, सुचिता बारगळे, ज्योत्स्ना भरडा आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

बुद्ध आणि त्यांचा धम्म : प्रबोधन पर्व उपक्रमाचे पनवेलमध्ये उद्घाटन

पनवेल : रामप्रहर वृत्त

दि धम्म संहिता ॲक्शन कमिटी ऑफ इंडियाच्या वतीने अनेक वर्षांपासून बौद्धांसाठी कायदा व्हावा, अशी मागणी करीत आहोत. याचाच एक भाग म्हणून आसूडगाव येथील बुद्ध विहारात वर्षावासनिमित्त सायंकाळी बुद्ध आणि त्यांचा धम्म :प्रबोधन पर्व हा उपक्रम राबवित आहोत तसेच २० ते २५ ऑक्टोबरदरम्यान चैत्यभूमी ते दीक्षाभूमी धम्मयात्रा काढण्यात येईल. यात मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्रा. ॲड. दिलीप काकडे यांनी केले.

पनवेल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात बुद्ध आणि त्यांचा धम्म : प्रबोधन पर्व या उपक्रमाचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष महेंद्र मोरे यांच्या हस्ते झाले. या सोहळ्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. ॲड. काकडे बोलत होते.

या वेळी बौद्ध महासभेचे रायगड तालुकाध्यक्ष काशिनाथ कांबळे, संतोष इंगळे, अरुण कांबळे, जी. बी. कदम, महेंद्र कांबळे, प्रवीण जठार, चंद्रसेन कांबळे, ॲड. मिलन जंगलबाग, नम्रता काकडे, मुकुंद रोटे, अमरीश मेश्राम, सुभद्रा रोटे, महेश जाधव, गणेश कांबळे, राहुल शिंदे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. मुकेश दुपारे, सूत्रसंचालन बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष सुनील वाघपंजे यांनी केले, तर आभार कुशलकुमार जंगलबाग यांनी मानले.

पनवेल : भारतीय जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्मृतीदिनानिमित्त भाजपच्या वतीने अभिवादन करण्यात आले. या वेळी पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, गोपीनाथ पाटील, अरुण भोईर, पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, सावळेचे माजी सरपंच शिवाजी माळी, हरिश्चंद्र बोडे, गणपत गोठल, प्रभाकर कार्लेकर, जिल्हा विस्तारक अविनाश कोळी, सोपान जांभेकर आदी उपस्थित होते.

सीकेटी विद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात

पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माधम माध्यमिक विभाग गुरूपौर्णिमा उत्सव नुकताच मोठ्या उत्साहात साजरा झाला. या वेळी योगकेंद्र आणि आरोग्य सेवा समिती पनवेलचे अध्यक्ष सूर्यकांत फडके हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती आणि गुरू व्यास यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. यानंतर शालेय गायकवृंदाने सुरेल प्रार्थना व स्वागतगीत सादर केले. मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत गुरूचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

जीनल वालावलकर हिने मेधासूक्त गाऊन वातावरण मंगलमय केले. श्रावणी थळे हिने सुमधूर स्वरात गुरूअष्टक गायले. गुरूपौर्णिमेनिमित्त विद्यालयात कथाकथन स्पर्धा तसेच भाषण स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्यातिल यशस्वी विद्यार्थ्यांचे सादरीकरण या वेळी झाले. इ. नववीतील विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंना अप्रतिम नृत्यातून गुरूवंदना अर्पण केली.

प्रमुख पाहुणे सूर्यकांत फडके यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल खेळाचे तोटे आणि मैदानी खेळांचे फायदे याविषयी जागृत केले तसेच तन व मनाच्या आरोग्याची काळजी घ्या, असे सांगत संस्कार आणि प्रार्थनेचे महत्त्व विशद केले.

ऋतुजा आणि कनिष्का या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सूत्रसंचलन केले. या वेळी सीकेटी विद्यालयातील विविध विभाग प्रमुख तसेच शिक्षक पालक संघ प्रतिनिधी सरला चौधरी व हिमाली पाटील उपस्थित होते.

दि. बा. पाटील विद्यालयात विद्यार्थी प्रकल्प उपक्रम

कामोठे : रामप्रहर वृत्त

गुरुशाला इंडस टॉवर्स लिमिटेड आणि व्होडाफोन आयडिया फाऊंडेशनचा उपक्रम आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात विद्यार्थी प्रकल्प राबविण्यात आला.

प्रकल्पाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी मूल्यांकनाने झाली. प्रकल्प सुलभ आणि परस्परसंवादी बनविण्यासाठी, त्याची संपूर्ण आठवड्यात चार सत्रांमध्ये विभागणी करण्यात आली. सर्व चार सत्रे पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे वितरित करण्यात आली होती.

समाज आणि आपण, सांस्कृतिक प्रेरणा आणि जागरूकता आणि संस्कृती आणि विविधता शोधणे यांसारख्या थीम होत्या.

सत्राच्या शेवटच्या दिवशी, विद्यार्थ्यांना नागरिकत्व शिक्षणाविषयी समजावून सांगण्यात आले, जिथे त्यांना संविधान, लोकशाही, प्रस्तावना, मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये याविषयी माहिती दिली.

पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी देवद येथील संदीप वाघमारे यांच्या घरी सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, निलेश वाघमारे आदी उपस्थित होते.

संपादकीय

दीर्घकालीन डावपेच

शिवसेना असो किंवा राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांमध्ये जी काही फुटाफूट झाली त्याचे खापर भारतीय जनता पक्षावर म्हणजेच पर्यायाने देवेंद्र फडणवीस यांच्यावर फोडले जात आहे. वास्तविक या दोन्ही पक्षांमध्ये अंतस्थ नाराजी प्रचंड होती. त्यामुळे कधी ना कधी असले स्फोट होणार हे सांगायला कुठल्या भविष्यवेत्त्याची गरज नव्हती.

महाराष्ट्राच्या राजकीय रंगमंचावर गेल्या दोनतीन दिवसांमध्ये जे काही नाट्य घडून गेले व अद्यापही सुरू आहे, त्याचे परिणाम दीर्घकाळ बघायला मिळतील. गेले काही महिने पडद्यामागे काही तरी घडते आहे अशी कुणकुण अनेकांना होती, परंतु नेमके काय चालू आहे याचा अंदाज भल्याभल्यांना आला नाही आणि मग अचानक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नऊ आमदारांनी सेना-भाजप सरकारमध्ये सामील होत थेट मंत्रिपदाची शपथच घेऊन टाकली. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली हे साऱ्या देशाने पाहिले. वर्षभरापूर्वी असेच फुटीचे नाट्य शिवसेनेबाबत घडले होते. त्या फुटीच्या धक्क्यातून ठाकरे गट अद्यापही सावरलेला नाही आणि निवडणुकीपर्यंत तो सावरण्याची शक्यतादेखील दिसत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचेही जवळपास तसेच झाले आहे. उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतलेले अजित पवार यांनी संपूर्ण पक्षाचा ताबा मिळवण्याच्या दृष्टीने कायदेशीर हालचाली आधीपासूनच केल्यामुळे अपात्र ठरण्याची शक्यताच नष्ट करण्यात त्यांना यश येईल. अजित पवार यांनी वरिष्ठांपासून फारकत घेताना काही गौप्यस्फोट केले, ते भविष्यात संबंधितांना अडचणीचे ठरू शकतील की काय अशी चर्चा सुरू झाली आहे. वयाच्या ८३व्या वर्षी तुम्ही थांबणार की नाही, असा सवाल अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या दैवताला अर्थात शरद पवार यांना उद्देशून विचारला. दैवताला वय नसते हे ते विसरले असावेत. अर्थात राजकारणात असो वा कुठल्याही सामाजिक क्षेत्रात कुठे तरी थांबले पाहिजे आणि नव्या पिढीच्या हातात सूत्रे दिली पाहिजेत असा एक सूर नेहमीच उमटत असतो. त्यात अगदीच तथ्य नाही असे नाही, परंतु काही ज्येष्ठ नेत्यांचा अनुभव दीपस्तंभासारखा दिशा दाखवत असतो. वय वाढले म्हणजे कार्यक्षमता संपली असे होत नाही, परंतु राजकारणामध्ये सध्या सारे काही पटकन हवे अशी घाई अनेकांना सुटली आहे. अजित पवार यांनी आताच ही संधी साधली नसती तर कदाचित त्यांना पुन्हा कधीही ती मिळाली नसती ही बाबसुद्धा ध्यानात घ्यायला हवी. मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि भाजप यांचे सरकार बहुमताच्या जोरावर कारभार करत आहे. त्यात आणखी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४० आमदारांची भर कशाला घातली, असा सवालही विचारला जात आहे. काही राजकीय डावपेच हे नजीकच्या भविष्यकाळापेक्षा दीर्घकालीन घडामोडींवर लक्ष ठेवून रचावे लागतात. पुढील वर्षी निवडणुकीची धामधूम सर्वत्र असेल. लोकसभेच्या निवडणुका जेमतेम वर्षभरावर येऊन ठेपल्या आहेत. विधानसभेच्या निवडणुका तसेच २३ महानगरपालिकांच्या निवडणुका याच वर्षात पार पाडाव्या लागतील. अशा परिस्थितीत रणांगणापूर्वीच शत्रुपक्ष गलितगात्र करण्याची चाणक्यनीती राजकारणात अभिप्रेत असते. अर्थात अशाप्रकारचे डावपेच सर्वांनाच रचता येतात असे नव्हे. विरोधकांची दयनीय अवस्था पाहता आगामी सार्वत्रिक निवडणुकीत पुन्हा एकदा मोदी सरकार येणार अशी चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. देशाच्या विकासासाठी हे आवश्यकच आहे. घायाळ अवस्थेतील विरोधक काहीही म्हणोत, येणारा भविष्यकाळ भाजपसाठी उज्ज्वल आहेच.

राष्ट्रवादीतील फुट भाजपसाठी फायद्याची

खबरबात
प्रकाश सोनवडेकर

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फुट पडल्यामुळे राज्यातील राजकीय समिकरण बदलले आहे. रायगडातदेखील याचे राजकीय परिणाम होणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पडलेल्या फुटीचा रायगड लोकसभा मतदारसंघात भाजपला फायदा होणार आहे.

अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचा एक गट थेट शिवसेना शिंदे गट आणि भाजप युतीत दाखल झाला. त्यामुळे शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली आहे. शरद पवार यांना सोडून अनेक आमदार आणि खासदार अजित पवार यांच्या गटात दाखल झाले. यात रायगड जिल्ह्यातील खासदार सुनील तटकरे, आमदार आदिती तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांचा समावेश आहे. त्यामुळे बंडखोरीचा मोठा फटका शरद पवार यांच्या गटावर होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. रायगड जिल्ह्यातील बहुतांश राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी सुनील तटकरे यांच्या पाठीशी आहेत. बहुतांश, आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्ते अजित पवार यांच्याबरोबर म्हणजे खासदार सुनील तटकरे यांच्याबरोबर आहेत. भाजप, शिवसेना यांच्याबरोबर आता अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आली आहे. त्याचा फायदा लोकसभा निवडणूकीत भाजपला होईल. रायगड लोकसभा मतदारसंघात भाजपची ताकद वाढणार आहे.

अजित पवार यांच्यासमवेत नऊ मंत्र्यांचा मंत्रीमडळात समावेश करण्यात आला. यात कॅबिनेट मंत्री म्हणून आदिती तटकरे यांची वर्णी लागली. खासदार सुनील तटकरे यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. जिल्ह्याच्या राजकारणावर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर तटकरे कुटूंबांची घट्ट पकड आहे. जिल्ह्यात श्रीवर्धन आणि कर्जत खालापूर या दोन विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद आहे. महाड, पेण या दोन मतदारसघांमध्येदेखील राष्ट्रवादी काँग्रेसची बऱ्यापैकी ताकद आहे.

रायगड लोकसभा मतदारसंघात दोनवेळी शिवसेनेचे अनंत गिते निवडून आले होते. २०१४मध्ये गिते यांनी सुनील तटकरे यांचा पराभव केला होता. तेव्हा शिवसेना आणि भाजपा युती होती. २०१९साली झालेल्या लोकसभा निवडूकीत शिवसेना-भाजप युती होती. तरी देखील शिवसेनेचे उमेदवार अनंत गिते यांचा पराभव करून सुनील तटकरे निवडून आले. विधानसभा निवडणूकीनंतर शिवसेना, काँगेस, राष्ट्रवारी काँग्रेस यांच्या महाविकास आघाडीचे सरकार आले. त्यामुळे या मतदारसंघातील राजकीय परिस्थिती बदलली. त्यानंतर शिवसेनेत फुट पडल्यामुळे महाराष्ट्रातील सरकार बलदले. एकनाथ शिंदे यांच्या सोबत शिवसेनेचे ४० आमदार गेले. त्यात रायगड जिल्ह्यातील तीन आमदारांचा समावेश होता. शिंदे गट सोबत आल्यामुळे रायगड लोकसभा मतदारसंघात भाजप-शिवसेना युतीची ताकद वाढली. या मदारसंघात अलिबाग, महाड, खेड या मतदारसंघांमध्ये शिंदे गटाचे आमदार आहेत. पेण मतदारसंघात भाजपचे आमदार आहेत. शेकापचे पेणचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी दोन महिन्यांपूर्वी भाजपत प्रवेश केला. रायगड जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. रायगड जिल्हा भाजप अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचा या जिल्हा चांगला संपर्क आहे. त्यांनी पक्षाची संघटनात्मक फळी उभी केली आहे. यामुळे या मतदारसंघात भाजपची ताकद वाढली आहे.

रायगड लोकसभा मतदारसंघात काँगेस व शेकाप यांची ताकद होती. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद होती. मागील काही वर्षांती राजकीय घडामोडींमध्ये काँग्रेस आणि शेकापची ताकद कमी झाली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसची हो दाने पक्ष या मतदारसंघात बालाढ्या होते, परंतु आता शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातदेखील फुट पडली आहे. या दोन्ही पाक्षतील बालढ्य नेते आता भाजपासोबत आहेत. राष्ट्रवादीचे रायगडचे विद्यमान खासदार सुनील तटकरे, त्यांच्या कन्या मंत्री अदिती तटकरे, सुनील तटकरे यांच पुत्र आमदार अनिकेत तटकरे यांच्यासह जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सोबत आहेत. भाजप-शिवसेना यांच्यासोबत आता राष्ट्रवादी काँग्रेस आली आहे. भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस यांची महायुती असल्यामुळे त्याचा फायदा रायगड लोकसभा मतदारसंघात भाजपला होईल.

लोकसभा नाही तर आगामी विधानसभा निवडणूक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्येदेखील वेगळे चित्र असेल. रायगड जिल्हा परिषदेतदेखील भाजप-शिवसेन-राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच सत्ता येईल. जिल्ह्यातील बहुतांश नगर परिषदा व नगरपंचायतींमध्ये महायुतीची सत्ता येईल. नवील राजकीय घडामोडींमुळे केवळ रायगड लोकसभा मतदारसंघातच नाही तर विधानसभा मतदारसंघांमध्येदेखील चित्र वेगळे असेल. बहुतांश नगर परिषदामध्ये सत्तांतर होईल. त्यमुळे या जिल्ह्यात भविष्यात भाजपला पोषक वातवरण असेल.

भारतीय क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनी

सर्वांस यशस्वी भारतीय कर्णधार म्हणून महेंद्रसिंग धोनी याच्याकडे पाहिले जाते. त्याचाच नेतृत्वात भारताने दुसऱ्यांदा २०११चा, एकदिवसीय वर्ल्डकप आणि २००७चा, २०-२०चा वर्ल्डकप जिंकून क्रिकेटचे जगजेत्ते आपण आहोत हे जगाला दाखवून दिले. एका सामान्य कुटुंबात व खेडेगावात जन्मलेल्या ह्या मुलांन लाखो रुपये लावून व मोठमोठ्या क्रिकेट अकादमीत शिकून जे त्यांना जमले नाही ते धोनीने करून दाखवले.

धोनी हा त्याच्या खेळामुळे व स्वभावामुळे खुपच प्रसिद्ध झाला. महेंद्रसिंग धोनी हा आपल्या खडतर मेहनतीने जगातील सर्वात श्रीमंत खेळाडू ठरला आहे. ज्याची वार्षिक कमाई साधारण २०० कोटी ते २१० कोटी इतकी आहे.देशांतर्गत खेळल्या जाणाऱ्या आयपीएलच्या चेन्नई संघाचा तो कायम कर्णधार असून, त्याच्या नेतृत्वात हा संघ ३ वेळा विजेता राहिला आहे.

थोडासा लाजाळू व मितभाषी असलेल्या महेंद्रसिंग धोनीचा जन्म ७ जुलै १९८१ बिहार येथे झाला. धोनी हा माही या नावाने खूप प्रसिद्ध आहे. धोनीला जगातील सर्वात श्रेष्ठ फिनिशर म्हणून ओळखले जाते. धोनीला २००७मध्ये राजीव गांधी खेळ रत्न पुरस्कार, २००९मध्ये सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मश्री आणि २०१८ मध्ये भारताचा तिसरा सर्वात मोठा नागरी पुरस्कार पद्मभूषणने सन्मानित करण्यात आलेल आहे. इंडियन आर्मीनेसुद्धा १ नोव्हेंबर २०११ रोजी धोनीला लेफ्टनंट कर्नल ही मानद पदवी प्रधान केली आहे. धोनीच मुळगाव हे उत्तराखंड राज्यातील लावली हे असून अल्मोडा जिल्ह्यामध्ये येते. दोन्हीचे आई-वडिल नोकरीनिमित्त उत्तराखंड येथून रांची झारखंड येथे कायमस्वरूपी स्थलांतरित झाले. धोनीला एक बहीन व एक भाऊ आहे.

महेंद्रसिंग धोनी मैदानात उतरला की, प्रेक्षक अखं मैदान माही, माही या नावाचा जयघोष होतो. क्रिकेटकडे पाहण्याचा दृष्टिकोन खऱ्याअर्थाने ह्या खेळाडूने बदलून टाकला. काही शतकातून असा खेळाडू जन्माला येतो, त्याने खेळातून केलेल्या देशसेवेल सलाम.

(साभार : जगदुनिया)

बदलते तंत्रज्ञान

जाणून घ्या घरच्या घरी फोन स्वच्छ कसा करायचा?

घरच्या घरी फोन स्वच्छ कसा करायचा? जाणून घ्या या सोप्या टिप्सफोन हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा घटक आहे. हल्ली माणूस फोनशिवाय जगू शकत नाही. दररोजच्या धावपळीत फोन स्वच्छ करायला वेळ मिळत नाही ज्यामुळे फोनचे आतील पार्ट्स खराब होऊ शकतात. जर तुम्हालाही तुमचा फोन घरच्या घरी स्वच्छ करायचा असेल तर तुम्ही काही खास टिप्स फॉलो करू शकता. पावसाळ्यामध्ये अनेक वेळा मोबाईल पाण्यात भिजतो. तो तसाच राहिल्याने मोबाईलमधील आतील पार्ट्स खराब होण्याची शक्यता असल्याने तो वेळच्या वेळी साफ करावा. त्यासाठी काही टिप्स जाणून घेऊया...

१. फोन स्वच्छ करण्यासाठी कधीच कोणत्याही स्प्रेमध्ये क्लीनर भरु नये. कारण यामुळे क्लीनर फोनच्या आत जाण्याची जास्त भीती असते आणि फोन खराब होऊ शकतो.

२. कधीही फोन स्वच्छ करताना कॅमेरा घासू नका यामुळे कॅमेराची लेन्स खराब होऊ शकते.

३. स्मार्टफोन स्वच्छ करताना अल्कोहोलशी संबंधीत क्लीनर्स वापरा कारण हे क्लीनर्स फोनच्या आतमध्ये गेले तरी काही क्षणातच हवेत शोषून घेतले जातात आणि कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही.

४. फोन स्वच्छ करताना जर तुम्ही एखाद्या ब्रशचा वापर करत असाल तर ब्रश सॉफ्ट आहे का, हे तपासा आणि ब्रशचा आकारही लहान निवडा. यामुळे फोनवर स्क्रॅचेस येत नाही.

५. फोन स्वच्छ करताना कधीच घरातील जुन्या कपड्यांचा वापर करू नका. याऐवजी तुम्ही मायक्रोफायबर क्लॉथचा वापर करू शकता. हा कापड मऊ असतो आणि स्वच्छ करण्यासाठी सोयीस्कर असतो.

(टीप: वरील लेख हा प्राप्त माहितीवर आधारित आहे)

शेरलॉक होम्सचे लेखक सर आर्थर कॉनन डॉइल

निमित्त

आयरिश कथा कादंबरीकर. 'शेरलॉक होम्स' ह्या जगद्विख्यात व्यक्तिरेखेचा निर्माता. एडिंबरो येथे एका रोमन कॅथलिक कुटुंबात जन्मला. एडिंबरो विद्यापीठातून वैद्यकाची एम. डी. ही पदवी संपादन केली (१८८५). काही वर्षे वैद्यकाचा व्यवसायही केला. तथापि १८९० नंतर त्याने स्वतःस सर्वस्वी लेखनास वाहून घेतले, मात्र बोअर युद्ध सुरू झाल्यानंतर दक्षिण आफ्रिकेत जाऊन एक प्रमुख शल्यचिकित्सक म्हणून त्याने काम केले.

डॉइल हा मुख्यतः रहस्यकथाकार म्हणून ओळखला जातो. विक्षिप्त पण चतुर गुप्तहेर शेरलॉक होम्स हा त्याचा मानसपुत्र अ स्टडी इन स्कार्लेट (१८८७) ह्या त्याच्या पहिल्याच कादंबरीत अवतरला. एडिंबरो येथील एक नामवंत शल्यचिकित्सक डॉक्टर बेल ह्याच्यावरून ही व्यक्तिरेखा त्याला अंशतः सुचली. डॉक्टर वॉटसन हा शेरलॉक होम्सचा साहाय्यक. ही जोडगोळी इतकी लोकप्रिय झाली, की जिवंत माणसांचा उमटावा तसा त्यांचा ठसा डॉइलच्या वाटकांवर उमटला. देशोदेशींच्या गुप्तहेरकथालेखनावरही डॉइलचा प्रभाव पडलेला आहे. संविधानकाची कौशल्यपूर्ण हाताळणी, वेधक निवेदनशैली ही त्याच्या रहस्यकथा-कादंबऱ्यांची लक्षणीय वैशिष्ट्ये आहेतच, तथापि गुन्ह्याच्या संशोधनचित्रणात शेरलॉक होम्सच्या व्यक्तिरेखेआडून स्वतः डॉइलने जी कल्पकता दाखविली, तिचा प्रभाव एकूण गुन्हेशास्त्रावरही पडला. नाटके, चित्रपट इत्यादींसाठी त्याच्या कथा-कांदबऱ्यांचा परिणामकारपणे उपयोग करून घेण्यात आलेला आहे. डॉइलच्या प्रसिद्ध शेरलॉक होम्स कांदबऱ्या अशा : द साइन ऑफ द फोर (१८९०), द हाउंड ऑफ द बास्कर्व्हिल्स १९०२, ह्या कादंबरीचे मराठी रूपांतर प्र. के. अत्रे ह्यांनी मोहित्यांचा शाप (आवृ. दुसरी १९६७) ह्या नावाने केलेले आहे आणि द व्हॅली ऑफ फिअर (१९१४). त्याच्या अनेक कथांतूनही शेरलॉक होम्स आणि वॉट्सन ही जोडगोळी आलेली आहे.

रहस्यकथा-कादंबऱ्यांव्यतिरिक्त त्याने काही ऐतिहासिक कादंबऱ्या व कविताही लिहिल्या. द व्हाइट कंपनी (१८९१), रोडनी स्टोन (१८९६) व सर नायगेल (१९०६) ह्या त्याच्या काही ऐतिहासिक कादंबऱ्या, तसेच साँग्ज ऑफ क्शन (१८९८) आणि साँग्ज ऑफ द रोड (१९११) हे त्याचे दोन कवितासंग्रहही प्रसिद्ध झाले.

दक्षिण आफ्रिका आणि ब्रिटन यांच्यात झालेल्या युद्धात द ग्रेट बोअर वॉर (१९००) ह्या नावाने लिहिलेल्या इतिहासात त्याने निःपक्षपातीपणाने दोन्ही बाजूंचे समतोल मूल्यमापन केले आहे, तथापि १९०२ मध्ये द वॉर इन साउथ आफ्रिका : इट्स कॉज अँड कॉंडक्ट हे पुस्तपत्र लिहून त्याने ब्रिटिश सरकारची बाजू मांडली. घटस्फोटाच्या कायद्यावर लिहून त्याने ब्रिटनमधील स्त्रियांच्या समान हक्कांचे समर्थन केले, तसेच बेल्जियम सत्तेने केलेल्या पिळवणुकीच्या निषेधार्थ त्याने लेखन केले.

आयुष्याच्या अखेरीस त्याने आपला सर्व वेळ अध्यात्मावरील श्रद्धा दृढ करण्यात व्यतीत केला; त्यात एक व्यक्तिगत दृष्टी होती. रोमन कॅथलिक पंथाचा तर वयाच्या एकविसाव्या वर्षीच त्याने त्याग केला होता. १९१७ ते १९२५ मध्ये त्याने यूरोप, ऑस्ट्रेलिया, कॅनडा इ. ठिकाणी जाऊन अध्यात्मावर भाषणे दिली, द न्यू रेव्हिलेशन (१९१८), द व्हायटल मेसेज (१९१९), द वॉंडरिंग्ज ऑफ अ स्पिरिच्यूअलिस्ट (१९२१) आणि हिस्टरी ऑफ स्पिरिच्यूअलिझम (१९२६) ही अध्यात्मपर पुस्तके त्याने लिहिली. ससेक्स परगण्यातील क्रोबर येथे तो निधन पावला.

लेखिका : शशिकांत गोखले
माहिती स्रोत : मराठी विश्वकोश

क्लिक...क्लिक...!

खोपोली : दमदार पावसाला सुरुवात झाली असून खंडाळा घाटातील डोंगरांवर ढग उतरलेले हे दृष्य.

आरोग्य प्रहर

लहान मुलांच्या आहारात करा 'या' गोष्टींचा समावेश!

संपूर्ण देशात मान्सूनला सुरुवात झाली आहे. पावसाळा येताच लोक आजारी पडू लागतात. अशावेळी जर तुम्ही स्वतःची काळजी घेतली नाही तर तुम्हाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. त्याचबरोबर पावसाळ्यात मुले अधिक आजारी पडतात. त्यामुळे या ऋतूत मुलांच्या आहाराची विशेष काळजी घ्यावी. मुलांच्या जेवणात कोणत्या गोष्टींचा समावेश असावा हे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

पावसाळ्यात मुलांना द्या 'या' गोष्टी

कारले : चवीला एकदम कडू असल्याने अनेकांना, त्यातले त्यात लहान मुलांना कारले खायला आवडत नाही, पण तुम्हाला माहित आहे का की पावसाळ्यात कारले खाणे मुलांच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते कारण यात अँटी-बॅक्टेरियल, अँटी-फंगल इत्यादी गुणधर्म असतात.

डाळी : पावसाळ्यात मुलांना निरोगी आणि तंदुरुस्त ठेवण्यासाठी तुम्ही त्यांच्या आहारात डाळींचा समावेश करू शकता. कारण डाळीमध्ये प्रथिने असतात जे उर्जेचा चांगला स्त्रोत आहे. त्याचबरोबर हंगामी संसर्गापासून संरक्षण आणि रोगप्रतिकारशक्ती बळकट करण्यासाठीही उपयुक्त ठरते. त्यामुळे पावसाळ्यात डाळींचे सेवन अवश्य करावे.

हळदीचे दूध : पावसाळ्यात मुलांनी हळदीचे दूध अवश्य प्यावे. कारण यात अँटीऑक्सिडंट्स असतात जे मुलांची रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्याचे काम करतात, म्हणून मुलांनी दररोज हळदीचे दूध पिणे आवश्यक आहे.

ड्रायफ्रूट्स : पावसाळ्याच्या दिवसात मुलांनी ड्रायफ्रूट्सचे सेवन अवश्य करावे. ड्रायफ्रूट्समध्ये व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स असतात जे मुलांच्या शरीराला ऊर्जावान ठेवतात. ज्यामुळे पावसाळ्यात मुले कमी आजारी पडतात. याचाही आहारात समावेश करावा.

(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)

पेशवेकालीन तलावाच्या संवर्धनाची गरज

धाकटी पंढरी पायथ्यालगतचा तलाव नामशेष होण्याची भीती

खोपोली : प्रतिनिधी

प्रवासादरम्यान प्रत्येकाची मूलभूत गरज असलेल्या पाणी या जीवन घटकासाठी अनेक जलस्त्रोत खालापूर तालुक्यात विविध ठिकाणी दिसतात. त्यातील सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे खोपोली शहरातील श्री वीरेश्वर देवस्थानाच्या शेजारी असलेला पेशवेकालीन कंकण तलाव. अत्यंत सुसज्ज आणि वास्तूकलेचा अप्रतिम नमुना असलेला कंकण तलाव हा इतिहासाची साक्ष देत आजही भक्कमपणे उभा आहे, मात्र अजून एक तलाव असा आहे की, ज्याची तुलना कंकण तलावा सोबत करता येईल, तशाच जडणघडणीचा चौकोनी स्वरूपाच्या बांधणीचा इतिहासकालीन तलाव सारसन आणि ताकई गावाचे दरम्यान असून त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे तो अखेरच्या घटका मोजत आहे.



(छाया : जयवंत माडपे)

श्री क्षेत्र धाकटी पंढरी देवस्थानाच्या डोंगर पायथ्याशी खोपोली-पेण रस्त्याशेजारी अगदी काही अंतरावर हा ऐतिहासिक दगडी बांधणीचा चौरस आकाराचा सुंदर असा तलाव आहे. तलावाची बांधणी पेशवेकालीन कंकण तलावासारखीच घडीव दगडांची असून वास्तूकलेचा अप्रतिम नमुना म्हणून तो डोळ्यात भरल्याशिवाय राहणार नाही. इ. स. १७४०च्या दरम्यान या तलावाची निर्मिती झाल्याची ढोबळ माहिती आहे. साधारण ११५ फूट लांब, ६६ फूट रुंद आणि १५ फूट खोल अशा या तलावात उतरण्यासाठी पूर्वेच्या बाजूस दगडी पायऱ्या आहेत, तर आत उतरताना उजव्या बाजूला एक चौकोनी शिलालेख असून त्यावर मोडी किंवा संस्कृत सदृश्य लिखाण आहे.

तलावाची पश्चिम आणि उत्तर बाजूची भिंत दोलायमान अवस्थेत असून, काही ठिकाणी कोसळली आहे. या तलावात कडक उन्हाळ्यातदेखील पाणीसाठा असतो. तलावाशेजारी राहणारे खोपोली नगर परिषदेचे रिटायर्ड नगर अभियंता रामकृष्ण शहाणे, सचिन शहाणे कुटुंबीय या तलावाची देखरेख करीत असून, तो टिकून राहावा यासाठी त्यांचे कसोशीने प्रयत्न सुरू आहेत. त्यांनी पदरमोड करीत त्या विहिरीची पडलेली बाजू बांधून काढली असल्याने सध्या पुढची पडझड थांबली जरी असली तरी काळाच्या ओघात ही वास्तू कधी कोसळेल हे सांगता येत नाही.

रामकृष्ण शहाणे कुटुंबियाप्रमाणेच खोपोलीतील निसर्ग मित्र गुरुनाथ साठेलकर, रायगड भूषण जगदीश मरागजे, पर्यावरण प्रेमी रवींद्र कुलकर्णी, सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर, क्रीडा प्रशिक्षक समिर शिंदे आणि अमित विचारे हे या तलावाच्या संवर्धनासाठी प्रयत्नशील आहेत. खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनीदेखील या प्रकरणी लक्ष घातले असून भारतीय पुरातत्व खात्याशी संपर्क करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

RE-E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

Sr. No.	Particulars	Description
1	Tender No. & Name of Tender	**RFx No. 7000027869** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-36/ 2023-2024 RFx E-Tender for Work of AMC of various regular Preventative Maintenance / Emergency and Breakdown Works of various 220kV & 100kV Substations under EHV O&M Div., Panvel. **Tender Amount:** Limited Rs. 25,00,000/- **EMD Amount:** Rs. 25,000/-
2	Online Downloading of the RFx	07.07.2023, 18:00 Hrs to 16.07.2023, 23:59 Hrs.
3	Online Submission of the RFx	On or Before 16.07.2023 up to 23:59 Hrs.
4	Online Opening of the Techno-Commercial RFx	17.07.2023 at 11:00 Hrs (If possible)

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
Note: All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn., Panvel

CHANGE IN NAME

I, MR. MURTUZAALI ISMALILALI NULWALA aged 53 years, an adult Indian Inhabitant, residing at ROOM NO-1304, SHREE, PLOT NO 164, SECTOR-04, KARANJADE, TAL-PANVEL, DIST-RAIGAD-410206. do hereby solemnly declare and affirm that my name mentioned in AADHAR CARD, PAN CARD, LIGHT BILL, AND other verified document is written as MR. MURTUZAALI ISMALILALI NULWALA and in PASSPORT is written as NULWALA MURTUZA ISMAIL belongs to the same person which will be continued in future and my date of birth mentioned in AADHAR CARD, PAN CARD, AND other verified document is written as 19/11/1970 and in PASSPORT is written 19/11/1972. I say & declare that I am swearing this affidavit before the concerned authority for proving that my real name is MR. MURTUZAALI ISMALILALI NULWALA and DATE OF BIRTH-19/11/1970 as per Notary of Affidavit No. **1704** on Dated **06/07/2023.**

Sd/-
(with new name)
MR. MURTUZAALI ISMALILALI NULWALA,
Add: ROOM NO-1304, SHREE, PLOT NO 164, SECTOR-04, KARANJADE TAL-PANVEL, DIST-RAIGAD-410206

रायगड जिल्हा परिषदेत शासन आपल्या दारी कार्यक्रम

प्रत्यक्ष लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप

अलिबाग : प्रतिनिधी

शासन आपल्या दारी उपक्रमाची रायगड जिल्हा परिषदमार्फत प्रभावी अंमबजावणी करण्यात येत असून, जिल्ह्यातील नागरिकांपर्यंत शासकीय योजनांची माहिती व पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यात येत आहेत. यानिमित्त जिल्हा परिषदेच्या स्व. ना. ना. पाटील सभागृहात बुधवारी (दि. ५) प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी महिला व बालल्याण, स्वच्छ भारत मिशन, ग्रामीण पाणीपुरवठा, ग्रामपंचयत, समाजकल्याण, सामान्य प्रशासन, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, आरोग्य, पशुसंवर्धन, शिक्षण, कृषी विभागातील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. उर्वरित लाभार्थ्यांना तालुका स्तरावर प्रमाणपत्रवाटप करण्यात येणार आहे.

या वेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, महिला व बालकल्याण विभाग निर्मला कुचिक यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते.

शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यात अधिकारी व कर्मचारी यांनी उत्तम काम केले आहे. लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणात मिळत आहे. नागरिक व प्रशासनाने हातात हात घालून काम केल्यास प्रत्येक योजना सफल होते. जिल्ह्यातील प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत योजना कशी पोहचेल व लाभार्थ्यांना लाभ मिळेल या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

-डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप

अपघातग्रस्तांची सामाजिक संस्था म्हणजे देवदूत

उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांचे गौरवोद्गार

चौक : प्रतिनिधी

अपघातग्रस्तांची सामाजिक संस्था ही परमेश्वराने अपघातग्रस्त जनतेच्या मदतीसाठी पाठवलेली देवदूत टीम आहे. या टीमसाठी लागणारी प्रशासकीय मदत करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असे उद्गार उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांनी काढले. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या वर्धापनदिनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी अजित नैराळे बोलत होते.

या वेळी अनेकांनी या सामजिक संस्थेचे कार्य विषद केले. कार्यक्रमास आलेल्या प्रत्येकाने अध्यक्ष गुरुनाथ साठेलकर व त्यांच्या टीमला शुभेच्छा दिल्या. खोपोलीचे माजी नगरसेवक किशोर पानसरे यांनी अपघातग्रस्त टीम देवदूत म्हणून काम करते, पण हे करीत असताना त्यांच्या जीविताची हमी कोण घेणार? हे काम प्रशासनाचे असून कर्तव्य मात्र टीम करीत आहे. हाच धागा पकडून या टीमचे प्रथम दहा शिलेदार यांचा प्रत्येकी दहा लाख रुपयांचा विमा काढून देण्याचे आश्वासन सामजिक संस्थेने दिले, तर पुढील वर्धापन दिनी या टीमला अपघातग्रस्त कवच देण्यासाठी प्रशासन, स्वामित्व दायित्व देणाऱ्या कंपन्या, व्यापारी व प्रतिष्ठित नागरिक यांच्याकडून योग्य ते सहकार्य करून घेण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेणार असल्याचे माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते दत्ताजी मसुरकर यांनी जाहीर केले.

अपघातग्रस्त टीमची दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयाने घेतली आहे. त्यामुळे त्यांच्या मदतकार्याची महती समजते. पंतप्रधान कार्यालयाने अपघातग्रस्त टीमबाबत योग्य ती कार्यवाही केल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात माध्यमातूनच जनतेला कळेल, असे खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी सांगितले. अपघातग्रस्त टीमला सहकार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. प्रास्ताविक व आभार गुरुनाथ साठेलकर यांनी तर सूत्रसंचालन जगदीश मरागजे यांनी केले.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती ह्या श्री. दिगंबर ज्ञानदेव पाटील डायरेक्टर ऑफ राधामाधव रिअलकॉन प्रा.लि. यांच्या मालकी वहिवाटीच्या असून सदर मिळकतींचे पणनयोग्य हक्कांची खात्री करुन घेण्यासाठी ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर मिळकती ह्या पूर्णपणे निर्वेध व निजोखमी व बोजारहित असल्याचा सदर मालकांचा भरवसा आहे. तरीही सदर मिळकतीमध्ये कोणाचा कसलाही गहाण, दान, बक्षीस, लीज, लीन, पोटगी, खरेदी - करार, अन्नवस्त्र या व अशा स्वरुपाचा कोठल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दावा, ताबा, कब्जा, वहिवाट, अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी हरकत घेऊन योग्य त्या कागदपत्रानिशी पुरावा दाखवून आमची खात्री पटवून द्यावी. तसे न केल्यास सदर मिळकतींमध्ये कोणाचा कोठलाही हक्क अगर हितसंबंध नाही अथवा असल्यास त्यांनी तो जाणून-बुजून सोडून दिला आहे, असे समजून सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी व बोजारहित असल्याचे गृहीत धरले जाईल व टायटल सर्टिफिकेट देण्यात येईल. नंतर कोणाचीही कोठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट

तुकडी रायगड, पोटतुकडी तालुका पनवेल, मौजे मोसारे येथील मे. दुय्यम निबंधक, पनवेल यांचे कार्यक्षेत्रातील व ग्रुप ग्रामपंचायत, नानोशी, तालुका पंचायत समिती, पनवेल, जिल्हा परिषद, रायगड यांचे हद्दीतील खालीलप्रमाणे शेतजमीन मिळकती.

अ. नं.	गट नं.	क्षेत्र (हे. आर)	अ. नं.	गट नं.	क्षेत्र (हे. आर)
१	६३/१	०.१२.९०	२	६८	०.२३
३	६९/१	०.१४.७०	४	८८/२/१	०.५३.५०
५	८८/२/२	०.५३	६	८८/८	०.०९.१०
७	८९/२	०.७२	८	९०/१/अ	२.००
९	९०/१/ब	२.०७	१०	९०/१/क	२.००
११	९०/२	०.४०	१२	१०३/१/२	०.७६

पनवेल,
दिनांक :- ०६/०७/२०२३

सही/-
ॲड. कौस्तुभ कुलकर्णी
मे. विरांका लीगल, ॲडव्होकेटस् व कन्सल्टंटस यांचेतर्फे भागीदार ऑफिस क्र. २०१, तेज हाऊस ५, महात्मा गांधी रस्ता, पुणे ४११ ००१. फोन क्रमांक २०-४८६१४९००,
info@virancalegal.com.

शिक्का

चिंबोऱ्या आणि गोड्या पाण्यातील माशांची मेजवानी

समुद्रातील मासे बंद झाल्याने खवय्यांची गर्दी

पाली : प्रतिनिधी

पावासाळा सुरू झाल्याने समुद्रातील मासेमारी बंद झाली आहे. परिणामी खवय्यांच्या उड्या आता गोड्या पाण्यातील मासे तसेच गोड्या चिंबोऱ्यांवर पडत आहेत. हे मासे व चिंबोऱ्या सध्या मोठ्या प्रमाणात बाजारात उपलब्ध होत असल्याने खवय्यांना मेजवानी मिळत आहे.

नदीकिनारी, ओहळ, वाहते धबधबे तसेच शेतात आणि डोंगर कपारीत सापडणाऱ्या गोड्या पाण्यातील विषेशतः काळ्या पाठीच्या चिंबोऱ्या तसेच मुठे सध्या मुबलक मिळत आहेत. पौष्टिक आणि चविष्ट अशा या चिंबोऱ्या व मुठे खवय्ये चवीने खातात, तसेच नद्या, तलाव, धरण, पाणवठे, ओढे, ओहळ, शेतात सापडणाऱ्या मळे, शिवडा, अरलय, वाम, कोलंबी, मंगरुळ, शिंगटी, चिवण्या, खवल आदी माशांची आवकही वाढली आहे.

या मोसमात सापडणाऱ्या बहुतांश माशांच्या पोटात अंडी सापडतात. त्याला स्थानिक भाषेत पेर किंवा गाबोळी वाले मासे म्हणतात. ही गाबोळी किंवा अंडी खवय्ये अतिशय ताव मारून खातात. कोळी बांधवांबरोबरच प्रामुख्याने आदिवासी आणि गळभोई समाजातील लोक खुप मेहनतीने हे मासे व चिंबोऱ्या पकडतात. हे विकून त्यांच्या हाती चार पैसे मिळतात. वल्गणीचे हे मासे खाण्यासाठी खूप चविष्ट असतात. त्यामुळेच माशांना खूप मागणी असते.

वल्गणीच्या माशांना मागणी :

सलग दोन-चार दिवस जोरदार पावसानंतर पाणी वाढल्यावर खाडीतील तसेच नदीतील मासे शेतातील कमी पाण्यात अंडी देण्यासाठी येतात. या वेळी आलेल्या माशांना पकडण्यासाठी मोठी झुंबड उडते. यालाच उधवण किंवा वल्गणीचे मासे असे म्हणतात.

कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- coud. kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

जा.क्र. : कुबनप/साबां/७४८/२०२३-२४ दिनांक : ०६/०७/२०२३

जाहीर निविदा सूचना क्र. ३६/२०२३-२४

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत ०६ कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. ०७/०७/२०२३ ते दि १७/०७/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे. व सदर निविदा शक्य झाल्यास दि. १८/०७/२०२३ रोजी दुपारी ४.०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतच्या सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/-
(योगेश गोडसे)
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग
पिन कोड - ४०२ २०१

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दूरध्वनी/फॅक्स क्रमांक :-(०२१४१) २२२०८४/२२५०९६

ई-निविदा सूचना क्र. १० सन २०२३-२०२४

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित किंमत रुपये
1	Repairs & maintenance to Jambhulpada Navghar Thanale Nadsur Bharje Bharjewadi road MDR-38 km 0/00 to km 38/00 Tal: Sudhagad, Dist.Raigad.	37,71,274,00
2	Repairs maintenance to Udhar Kumbharghar Mahagaon Chandargaon Hatond Gondav to NH-548A, MDR-40 road km 0/00 to 34/400 Tal: Sudhagad, Dist. Raigad.	25,19,485,00
3	Construction of Protection wall in stretches to Falyan Wave Jambhulpada Harnoli Navghar Thanale Bharje Bharjewadi eral Jamgaon road MDR-38 km 6/00 to 7/00 Tal: Sudhagad Dist. Raigad.	67,70,927,00

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ०७/०७/२०२३ (स.१०.००) ते दिनांक १४/०७/२०२३ (सं.१८.००)
ई-निविदा उघडणे :- दिनांक २०/०७/२०२३ (दु. ३.०० वा.) (कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग.)
खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/३०८१/२०२३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग - ४०२ २०१
दिनांक :- २७/०६/२०२३

सही/-
(जे. ई. सुखदेवे)
कार्यकारी अभियंता,
सा.बां.विभाग, अलिबाग,
जि. रायगड

...तरच बोगस मतदान थांबेल

आमदार मंदा म्हात्रेंचे निवडणूक ओळखपत्र आधार कार्ड जोडण्याचे आवाहन

ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिंगारे यांना पत्र

नवी मुंबई : बातमीदार

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी निवडणूक ओळखपत्र हे आधार कार्डशी जोडावे म्हणून ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिंगारे यांना पत्राद्वारे कळविले आहे.

भारतात निवडणुकांचा उत्सव उत्साहाने साजरा होत आहे. वर्षातून कोणती ना कोणती निवडणूक होतेच. पण बोगस मतदान ही खरी समस्या आहे. अनेकदा असे समोर आले आहे की, एकच व्यक्ती वेगवेगळ्या पत्यांवर, विविध शहरात, राज्यात एकाहून अधिक मतदार यादीत नोंदणीकृत असतो. विविध ठिकाणी नोंदणीचा फायदा घेत हा मतदार विविध ठिकाणी मतदान करतो. त्यामुळे त्याचा सर्वत्र संचार राहतो आणि तो वेगवेगळ्या भागात मतदान करतो. त्याचा परिणाम निवडणुकीच्या निकालावर खूप मोठा परिणाम होतो या बोगस आणि डूप्लिकेट मतदारांना आळा घालण्यासाठी बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी निवडणूक ओळखपत्र हे आधार कार्डशी जोडावे म्हणून ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिंगारे यांना पत्राद्वारे कळविले आहे. त्यामुळे निवडणूक ओळखपत्र हे अधिक सुरक्षित

करण्यासाठी मदत होणार असून दुबार व त्रिबार मतदारांची नोंदणीवरही निर्बंध लागणार आहे.

या वर्षी १८ वर्षे पूर्ण झालेल्या मतदारांचे मतदार कार्ड व पूर्वी असलेल्या मतदारांचे कार्ड हे आधार कार्डशी जोडावे जेणेकरून येणाऱ्या लोकसभेच्या किंवा सार्वत्रिक निवडणुका ह्यात पारदर्शकता निर्माण होऊन दुबार व त्रिबार असलेल्या मतदार नावांच्या यादया रद्दबादल होण्यास मदत होईल व नावामधील साम्य असलेलेही बोगस मतदार ही कमी होतील. त्यामुळे लोकप्रतिनिधींना वचक बसेल. मतदारांना गृहित न धरता काम दाखवूनच लोकप्रतिनिधींना मते मागावी लागतील. अनेकदा अडे होते की, काम न करता बोगस मतांच्या आधारावर अनेकदा निवडणुका जिंकल्या जातात. त्यामुळे खरोखर काम करणाऱ्या लोकप्रतिनिनवर अन्याय होतो, मात्र त्याचा फटका विकास कामांवर बसतो, तसेच बोगस मते थांबवली तर शहरातील अतिक्रमणांना आळा बसेल.

निवडणुकांपुरते रहिवाशी भागात आणल्या गेलेल्या घुसखोरांना त्यामुळे चाप बसेल, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

चिर्ले-दास्तानफाटा मार्गावरील खड्डे भरण्याची मागणी

उरण : प्रतिनिधी

उरण तालुक्यातील चिर्ले-दास्तानफाटा मार्गावर जोरदार पाऊस आणि अवजड वाहतुकीमुळे रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था होऊन मोठे खड्डे निर्माण झाले आहेत. हा रस्ता लवकरात लवकर खड्डेमुक्त करण्याची मागणी नागरिकांकडून होते आहे.

चिरले ते दास्तान या दरम्यान रेल्वेच्या पुलाचे काम सुरू असल्याने आणि अवजड वाहतुकीमुळे या रस्त्यावर चिखलाचा राडा निर्माण झाला आहे. संबंधित प्रशासनाने मार्गाची दखल घेऊन रस्ता नव्याने बनवून मजबुतीकरण करावे, अशी मागणी होत आहे.

या मार्गावर मोठे खड्डे निर्माण झाले आहेत. दुचाकी चालविणे जिकरीचे झाले आहे. हा मार्ग दुरुस्त न झाल्यास चालविताना अपघात होण्याचे नाकारता येत नाही.
-प्रल्हाद कासकर, प्रवासी, दिघोडे, उरण

या रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात करण्यात आली होती, परंतु येथील रहिवाशांच्या घरात पाणी जात असल्याने पाईप टाकून येत्या रविवारपर्यंत काम पूर्ण करून घेतले जाईल.
-नरेश पवार, उपअभियंता, सा. बां., उरण

निवडक

विभागीय महिला लोकशाही दिन

नवी मुंबई : कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन व विभागीय महिला लोकशाही दिन सोमवारी (दि. १०) सकाळी १०.३० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कोकण विभाग, यांचे कार्यालय, समिती सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. असे कोंकण विभागाचे उपायुक्त (सामान्य प्रशासन) मनोज रानडे व विभागीय उप आयुक्त महिला व बालविकास कार्यालय, मुलूंड येथील परुलेकर यांनी कळविले आहे.

११ जुलै रोजी पेन्शन अदालत

नवी मुंबई : कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवारी (दि. ११) सकाळी ११ वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे. पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे प्र.तहसिलदार, (सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

आवरे शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

उरण : सेवा निवृत्त कर्मचारी संघ उरण तर्फे उरण तालुक्यातील आवरे शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांना स्वेता दबडे यांनी शालेय जीवनात मुलांना आनंदाने शिक्षण कसे द्यावे याविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. साहेबराव ओहळ, संध्याराणी ओहाळ, वसंत कुडव सुनील पाटील, सुरेश भोईर, बळीराम थळी आदी उपस्थित होते. संजय धबडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी मुख्याध्यापक बबन पाटील,अरुणा तिरमाळी, निर्भय म्हात्रे, आहेर, गणेशप्रसाद गावंड, कोल्हे मॅडम तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सोमनाथ म्हात्रे, शंकर पाटील, प्रमोद म्हात्रे, अलका गावंड ,सुवर्णा म्हात्रे, प्रतिक्षा गावंड, माई म्हात्रे, रुपाली चव्हाण उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत सेवा निवृत्त कर्मचारी संघाने शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर या वेळी वेगळाच आनंद दिसून आला.

'तो' धोकादायक विद्युत खांब पालिकेने हटवला

नवी मुंबई : बातमीदार

वाशी येथील प्रसिद्ध जुहू चौपाटी येथील चौकात वर्षभरापुर्वी एक मोठा विद्युत हायमास्ट लावण्यात आला होता. या हायमास्टच्या शेजारी विद्युत पोल बंद होता. हा विद्युत पोल पालिकेने कसलाही विचार केलेले नव्हता. हा विद्युत पोल रस्त्यात असलेल्या दुभाजकांमध्ये न लावता तो दुभाजक सोडून काही अंतरावर रस्त्यावर लावलेला होता. त्यामुळे हा पोल वाहनचालकांना त्रासदायक ठरत होता. याबाबत सातत्याने भाजपाचे विकास सोरटे यांनी पालिकेकडे पाठपुरावा केला होता. त्यास यश येऊन हा पोल पालिकेकडून काढून टाकण्यात आला आहे.

दुचाकीस्वार या खांबाला धडकताना बचावले होते, मात्र तरीही याकडे पालिकेकडून देखील दुर्लक्ष होत होते. हायमास्ट लावल्यावर हा बंद विद्युत पोल काढणे आवश्यक होते, मात्र पालिकेच्या अनागोंदी कारभारामुळे धोकादायक पोल तसाच होता. याबाबत नागरिकांनीदेखील अनेक तक्रारी केल्या होत्या. सोरटे यांनी विद्युत विभागाकडे पाठपुरावा सुरू ठेवला होता. अखेर त्यास यश आले आहे.

अवैध वाहतूक करणाऱ्या बसेसवर कारवाई

नवी मुंबई : बातमीदार

खासगी बसेस मधून होणाऱ्या अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी नवी मुंबई आरटीओकडून अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. मे आणि जून महिन्यात तब्बल ७४ अवैध वाहतूक करणाऱ्या बसवर कारवाई करण्यात आली असून चार लाख ४९ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

आजही शहरातील महामार्गवर काही वाहने विना परवाना, फिटनेस, इन्शुरन्स व पीयूसी नसताना नियमबाह्यपणे चालविली जात आहेत. अनेकदा खासगी बसमधून प्रवासी वाहतुकीबरोबर व्यासायिक मालवाहतूक ही केली जाते. खासगी बसेस या प्रवासी वाहतुकीसाठी असून मालवाहतुकीसाठी त्याचा वापर करणे नियमात नसताना ही अनधिकृतरित्या मालवाहतूक केली जाते.

जादा प्रवासी वाहतूक करणे इत्यादी अवैध पध्दतीने वाहतूक केली जात आहे. अशा बसवर आरटीओकडून मे आणि जून या दोन महिन्यांत ७४ बसवर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून चार लाख ४९ हजार रुपये दंड वसूल करण्यात आली आहे, अशी माहिती आरटीओ उपप्रादेशिक अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी दिली आहे.

चिरनेर बेलडोंगरी येथे वृक्षारोपण

उरण : प्रतिनिधी

उरण तालुक्यात वनमहोत्सव सप्ताहानिमित्ताने वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या वतीने चिरनेर येथील बापूजी देव मंदिर परिसरात असणाऱ्या बेलडोंगरीच्या आनंदवनामध्ये रानमेवा झाडांचे वे वृक्षारोपणाचा कार्यक्रम करण्यात आला.

या वेळी आंबा, जांभूळ, रांजण, बोर अशा विविध वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान, पाणदिवे वटवृक्ष समाजिक संस्था, उलवे यांच्या मार्गदर्शनातून हा कार्यक्रम मोठ्या उत्सहात झाला. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी वटवृक्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष वरण मढवी यांच्याकडून लागणारी सर्व रानमेवा झाडे देण्यात आली आहेत.

या वेळी महाराष्ट्र युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मनोज पाटील, वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी, उपाध्यक्ष दिलीप मढवी, सचिव अभिमन्यू पाटील, सदस्य महेश भोईर, सदस्य वाईल्ड लाईफ फोटोग्राफर महेश मिरगे, केशव ठाकूर, बुधाजी पाटील आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

विद्याभवन शैक्षणिक संकुलात गरजूंना शालेय साहित्याची मदत

नवी मुंबई : प्रतिनिधी

आसावरी शेठ चॅरिटेबल ट्रस्ट, अंधेरी मार्फत विश्वत किशोर श्रॉफ व मुकुंद देशमुख यांच्या हस्ते विद्याभवन शैक्षणिक संकुल नेरूळ येथील २५ गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतेवेळी मुकुंद देशमुख म्हणाले, खूप शिका, आमच्याकडून शिक्षणासाठी भविष्यात इंजिनीयर किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक क्षेत्रात अडचण आली की, आम्ही तुम्हाला आर्थिक मदत करू. सर्वांचे चांगले आरोग्य राहण्यासाठी आरोग्य सुविधा व अन्नधान्याची सुविधा आम्ही देवू असे सर्वांना आश्वासित केले. विश्वस्त किशोर श्रॉफ यांनी विद्यार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे संचालक दिनेश मिसाळ यांनी नाशिक वसतिगृहात अन्नधान्य व नेरूळच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत दिल्याबद्दल ट्रस्टचे ऋण व्यक्त केले.

कार्यक्रमावेळी मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, राजकुमारी इंदलकर, श्रीजा नायर, मनीषा मुळीक तसेच समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका अस्मिता सलगर, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

नवी मुंबईतही होणार डीबीएस सर्जरी

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईने या शहरातील पहिली डीप ब्रेन स्टिम्युलेशन (डीबीएस) सर्जरी यशस्वीपणे केल्याची घोषणा केली आहे. नवी मुंबई शहरात उपलब्ध असलेल्या पार्किन्सन्स व इतर न्यूरॉलॉजिकल आजारांवरील उपचारांमध्ये एका नव्या युगाची सुरुवात कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलने केली आहे.

सर्जिकल टीमचे नेतृत्व करणारे, कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलचे कन्सल्टन्ट, न्यूरोसर्जरी (स्टिरीओटॅक्टिक व फंक्शनल न्यूरोसर्जरी) डॉ. अक्षत कयाल यांनी सांगितले, पार्किन्सन्स आजार पुढच्या टप्प्यात पोहचलेल्या रुग्णांसाठी डीबीएस आमूलाग्र परिवर्तन घडवून आणू शकते. या क्रांतिकारी उपचार पद्धतीमुळे पार्किन्सन्स आजार वाढण्याचा वेग मंदावू शकतो व रुग्णांच्या जीवनाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा होते. या प्रक्रियेमुळे आम्ही आजाराच्या लक्षणांवर अधिक चांगले नियंत्रण ठेवू शकतो व रुग्णांना अधिक चांगली जीवन गुणवत्ता प्रदान करू शकतो. खासकरून असे रुग्ण ज्यांच्यामध्ये पार्किन्सन्स आजारावरील औषधांना प्रतिरोध निर्माण झाला आहे किंवा साईड इफेक्ट्स दिसून येत आहेत अशांसाठी ही डीबीएस खूप उपयुक्त आहे. या प्रक्रियेला मिळालेले यश हा नवी मुंबईमध्ये आरोग्यसेवेत एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलचे कन्सल्टन्ट न्यूरॉलॉजिस्ट डॉ. अनिल वेंकीटचलम म्हणाले, पार्किन्सन्ससारख्या आजाराशी दीर्घकाळापासून सामना करीत असलेल्या रुग्णांसाठी ही उपचार पद्धत विशेष लाभदायक ठरते. आजाराच्या सुरुवातीच्या पाच वर्षात रुग्णांवर औषधांचे खूप चांगले परिणाम दिसून येतात, लक्षणांच्या व्यवस्थापनात औषधांचा खूप चांगला उपयोग होतो, पण आजार जसजसा वाढत जातो, तसतसे पुढील पाच वर्षात रुग्णांमध्ये औषधांना प्रतिरोध निर्माण होतो. आजाराच्या दुसऱ्या पाच वर्षांच्या टप्प्यामध्ये डीबीएस खूप लाभदायक ठरते. मेंदूला थेट स्टिम्युलेट केल्याने डीबीएस औषधांच्या प्रतिरोधाला बायपास करण्यात मदत करू शकते, आजार वाढण्याचा वेग मंदावू शकते, लक्षणे कमी करते, परिणामी रुग्णाच्या जीवन गुणवत्तेमध्ये लक्षणीय वाढ होते.

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईचे संचालक व प्रमुख डॉ. बिपीन चेवले यांनी सांगितले, आम्हा सर्वांसाठी हा अतिशय अभिमानस्पद क्षण आहे. हे यश मिळवून आमच्या हॉस्पिटलने एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे, इतकेच नव्हे तर, नवी मुंबईत उपलब्ध असलेल्या आरोग्यसेवांमध्येदेखील यामुळे खूप मोठी क्रांती घडून आली आहे.

शासनातर्फे महिला, मुलींना टेलरिंग प्रशिक्षण

नवी मुंबई : बातमीदार

शिवणकलेची आवड व त्याविषयीचे रितसर शिक्षण घेण्यासाठी इच्छुक व पात्र असणाऱ्या महिला व मुलींकरीता नवी मुंबई महापालिका समाजविकास विभागाच्या वतीने टेलरिंग प्रशिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सरकार मान्यताप्राप्त जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ यांच्या माध्यमातून हे टेलरिंग प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जात आहे.

सन २०२३-२४ वर्षातील या सहामाही व्यवसाय अभ्यासक्रमाचे १ जुलै २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ असे प्रवेश सत्र आहे. यामध्ये दोन व्यावसायिक अभ्यासक्रम असून पहिल्या शिवण - कर्तन व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सातवी उत्तीर्ण ही

(संग्रहित छायाचित्र)

शैक्षणिक पात्रता आवश्यक असून यामध्ये लहान मुले, स्त्रिया व पुरुष यांचे एकूण ३० प्रकारचे कपडे तयार करण्याचे शिकविण्यात येते. त्याचप्रमाणे दुसऱ्या स्पेशलायझेशन इन ब्लाऊज अभ्यासक्रमासाठी इ. आठवी उत्तीर्ण ही शैक्षणिक पात्रता आवश्यक असून त्यासोबत शिवण-कर्तन ही परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

या अभ्यासक्रमाकरीता प्रवेश अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक २१ जुलै असून प्रवेश शुल्क ३०० रुपये आहे. अंतिम दिनांकानंतर २२ ते ३० जुलैपर्यंत ५० रुपये विलंब शुल्कासह ३५० रुपये इतकी प्रवेश शुल्क रक्कम भरून प्रवेश घेतला जाऊ शकतो.

टेलरिंग अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या महापालिका क्षेत्रातील रहिवासी असलेल्या महिला व मुलींनी नवी मुंबई महापालिका टेलरिंग क्लास, दत्तगुरूनगर, न.मुं.म.पा. ग्रंथालय, दुसरा मजला, से.१५, वाशी, नवी मुंबई येथील वर्गशिक्षिका यांचेशी (९८६७१८५८३०) या क्रमांकावर तसेच जुने ग्रामपंचायत कार्यालय, खैरणे-बोनकोडे, नवी मुंबई येथील टेलरिंग क्लासच्या वर्ग शिक्षिका यांचेशी (९७६९९०१३५४) या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा समाजविकास विभाग कार्यालय, पहिला मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई येथे संपर्क साधावा अथवा अधिक माहितीसाठी (०२२-२७५६७२७९) या दूरध्वनी क्रमांकावर अथवा (९५९४८४१६६६) या क्रमांकावर संपर्क साधावयाचा आहे.

शिल्प चौकमधील उद्यानाची दुरवस्था

पनवेल : खारघरमधील शिल्प चौकमध्ये उभारण्यात आलेल्या उद्यानात कचऱ्याचे ढीग पडलेले आहेत. हा कचरा उचलण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

खारघर, सेक्टर-२० येथील शिल्प चौक खारघरमधील मध्यवर्ती ठिकाण आहे. चारही बाजूने दुकाने तसेच निवासी वस्ती असल्यामुळे परिसरातील मुलांना खेळण्यासाठी तसेच आबाल वृध्दांना बसण्यासाठी सिडकोने येथे उद्यान उभारले आहे. खारघर वसाहतीचे पनवेल महापालिकेकडे हस्तांतरण झाल्यामुळे उद्यान आणि मैदानाची महापालिकेकडून देखरेख केली जाते. या उद्यानात अनेक दिवसांपासून कचऱ्याचे ढीग पडून आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाने लक्ष देऊन उद्यानातील समस्या दूर करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

'डीडी सह्याद्री'वर आज 'स्वच्छंद काव्य संगीत संध्या'

नवी मुंबई : बातमीदार

नवी मुंबई महापालिकेच्या या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी 'वैष्णो व्हिजन' या कला संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील नामांकित कवी व संगीतकार, गायकांना घेऊन २३ जून २०२३ रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात 'स्वच्छंद काव्य संगीत संध्या' आयोजित करण्यात आली होती. या अभिनव कार्यक्रमाची दखल शासकीय पातळीवरून घेण्यात आली असून 'स्वच्छंद काव्य संगीत संध्या' कार्यक्रमाचे प्रसारण मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून शुक्रवारी (दि. ७) रात्री ८ ते ९ या वेळेत करण्यात येत आहे.

विष्णूदास भावे नाट्यगृहात रसिकांच्या भरगच्च उपस्थितीत झालेली ही स्वच्छंद काव्य संगीत संध्या प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी इच्छा असूनही उपस्थित न राहू शकलेल्या रसिकांसाठी डी डी सह्याद्री वाहिनीवर शुक्रवारी रात्री ८ वा. होणारे प्रक्षेपण ही आनंदपर्वणी असून ज्यांनी हा कार्यक्रम प्रत्यक्ष अनुभवलेला आहे त्यांनाही या प्रक्षेपणामुळे पुनर्प्रत्ययाचा आनंद घेता येईल. डी डी सह्याद्री वाहिनीवरून प्रक्षेपित होणारी 'स्वच्छंद काव्य संगीत संध्या' ही एकप्रकारे नवी मुंबईच्या स्वच्छता कामगिरीला मिळालेली कौतुकाची दाद असून नागरिकांनी शुक्रवारी दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवरील या कार्यक्रमाचा रात्री ८ ते ९ या वेळेत आवर्जून आस्वाद घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांचेमार्फत करण्यात येत आहे.

मुसळधार पावसातही भाविक पालीत दाखल

■ संकष्ट चतुर्थीला बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भक्तांच्या रांगा

पाली : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील अष्टविनायक तीर्थक्षेत्रांपैकी एक प्रसिद्ध असलेल्या पाली बल्लाळेश्वर मंदिरात संकष्ट चतुर्थीला गुरुवारी (दि. ६) पहाटेपासून बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. मुसळधार पावसातही भक्तांनी बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. भक्तांच्या गर्दीमुळे येथील स्थानिक व्यावसायिकांनाही दिलासा मिळाला आहे.

भाविकांची मोठी गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिक यांचा धंदादेखील तेजीत होता. परिसरातील दुकाने, हॉटेल व लॉज ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

(छाया : धम्मशील सावंत)

पाली बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टने भाविकांसाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध केल्या आहेत. देवस्थानचे दोन भक्तनिवास नाममात्र दरात भाविकांसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी आरओच्या शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. अत्यल्प दरात प्रसाद उपलब्ध आहे. भक्तांना रांगेत उभे राहण्यासाठी रेलिंग, मांडव व शेड उभारण्यात आली आहे.

वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंगदेखील आहे. प्रसादालय खुले आहेत, तसेच सुसज्ज स्वच्छतागृहदेखील उभारण्यात आले आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही, अशी माहिती बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे यांनी दिली. मुसळधार पावसातही गुरुवारी भक्तांनी बल्लाळेश्वराचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. यामुळे स्थानिक व्यावसायिकांचा व्यवसायही चांगला झाला.

> **जोरदार पाऊस असूनही संकष्ट चतुर्थीला मोठ्या संख्येने भाविक बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आले होते. त्यामुळे व्यवसायदेखील चांगला झाला.**
>
> **–मनोज मोरे,**
> **व्यावसाईक, बल्लाळेश्वर देवस्थान**

निवडक

उद्योजकाकडून आदिवासीवाडी दत्तक

श्रीवर्धन : कार्ले गावातील आदिवासीवाडी उद्योजक प्रिन्स बाबेल यांनी दत्तक घेतले असल्याचे सांगितले. आदिवासीवाडीतील शाळेला उद्योजक बाबेल यांच्या माध्यमातून तीन कॉम्पुटर, प्रोजेक्टर शैक्षणिक साहित्यवाटप व महिलांना साड्यावाटप करण्यात आले. या वेळी राष्ट्रवादी श्रीवर्धन मतदारसंघाचे अध्यक्ष महंमद मेमन, विजय तोडणकर, नंदू पाटील, नायब तहसीलदार भुर्के, बोर्ली पोलीस निरीक्षक प्रसाद ढेबे, शरद खेडेकर, आदी उपस्थित होते. पुण्यातील उद्योजक प्रिन्स बाबेल यांनी श्रीवर्धन तालुक्यातील दिवेअगार येथे एक जागा विकसित असताना परिसरातील वंचित पीडित समाजाला मोठे करण्यासाठी एक पाऊल पुढे उचलले आहे.

माणगावात आरोग्य तपासणी व वह्यावाटप

माणगाव : येथील कुणबी समाजाचे नेते स्व. बाबुराव भोनकर यांच्या जयंती दिनानिमित्त मंगळवारी (दि. ४) साले गावात श्री स्वयंभू गणेश मंदिरात बाबुरावजी भोनकर सामाजिक विकास संस्था यांच्यामार्फत व उपजिल्हा रुग्णालय, तालुका आरोग्य अधिकारी यांच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिर व विविध गावांत संस्थेतर्फे वह्यावाटप करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आरोग्य अधिकारी भारसाखळे, कुणबी समाजनेते सहदेव बक्कम, डॉ. प्रियांका वाढवळ, डॉ. फलक मोहाळ, डॉ. मुकुंद जाधव, रुपाली चांदोरकर, राजेंद्र खाडे, बी. जी. कदम, महा लॅबचे सुनील सर, राजेंद्र पवार, पंचायत समितीचे माजी सदस्य शैलेश भोनकर, सहदेव बक्कम, महादेव खडतर, सखाराम खरंगटे, नितीन खडतर, अमित ढाकवळ, जनार्दन वडेकर, रामचंद्र भोनकर, नितीन चांदोरकर, काशीराम पाटील, अनिल जाधव, प्रकाश भोनकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते, तसेच राजिप शाळा साले, तिलोरे, कोशिंबळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

'तेनझिंग नॉर्गे पुरस्कारासाठी प्रस्ताव करा'

अलिबाग : केंद्र शासनाने तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार वितरित करण्याकरिता नामांकनाचे प्रस्ताव पाठविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार सन–२०२२करिता केंद्र शासनास शिफारस करण्यासाठी नामांकन सादर करणाऱ्या खेळाडूंची कामगिरी मागील तीन वर्षांमधील म्हणजे सन–२०२०, २०२१, २०२२मधील असणे आवश्यक आहे. प्राप्त होणारी नामांकने, प्रस्ताव १५ जून ते १४ जुलै या कालावधीतच केंद्र शासनाच्या https://awards.gov.in या ऑनलाईन पोर्टलवर स्विकारण्यात येणार आहेत. त्यानुसार इच्छुक खेळाडूंनी आपले नामांकन, प्रस्ताव संचालनालयाच्या dsysdesk10gmail.com या ई–मेलवर पाठविण्यात यावेत, असे कळविले आहे.

पोलादपुरात आरोग्य तपासणी व लसीकरण शिबिर

पोलादपूर : रामप्रहर वृत्त

तालुक्यातील चांदके हे गाव आदिवासी बहुल असून २०२१मधील दरड्ग्रस्त गाव आहे. त्या वेळी या गावाकडे जाणारा रस्ता आठ ते १० फूट मातीखाली होता. या गावातील महिलांच्या व मुलांच्या आरोग्यविषयक तक्रारी होत्या, असे लक्षात आल्याच्या अनुषंगाने तालुका आरोग्य अधिकारी यांच्या सहकार्याने मंगळवारी चांदके गावात आरोग्य तपासणी व लसीकरण शिबिर घेण्यात आले.

या शिबिरात पेन्टा, ओपीव्ही, रोटा, आयपीयू, पीसीव्ही, एमआर, व्हिट यांसारखे लसीकरण करण्यात आले, अशी माहिती तहसिलदार कपिल घोरपडे यांनी दिली आहे.

पोलादपुरातील २१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची धामधूम सुरू

आरक्षणासह प्रभागरचनेची तयारी पूर्ण

पोलादपूर : प्रतिनिधी

तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांचा तिसरा टप्पा निवडणूक आयोगाच्या हिरव्या कंदिलाच्या प्रतीक्षेत असून आरक्षणासह प्रभागरचनेची तयारी पूर्ण करीत महसूल प्रशासनाने २१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी सज्जता दर्शविली आहे, मात्र प्रशासक असलेल्या रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका आधी जाहीर होणार की, ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा होणार याकडे सर्वपक्षियांचे लक्ष लागले आहे.

तालुक्यातील वझरवाडी, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खोंडा आणि तुर्भे खुर्द या चार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांनंतर भोगाव खुर्द, बोरघर, चांभारगणी बुद्रुक, दिविल, गोळेगणी, कालवली, कापडे खुर्द, कोतवाल बुद्रुक, कोतवाल खुर्द, धामणदिवी, लोहारे, ओंबळी, पैठण, पार्ले, परसुले आणि उमरठ या १६ ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेण्यात आल्या, मात्र तिसऱ्या टप्प्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुका अद्याप निवडणूक आयोगाच्या अधिकृत घोषणेच्या प्रतीक्षेत आहेत.

ग्रामपंचायत निवडणुकांच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यांच्या निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर तालुक्यातील दोन जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समितीच्या चार जागांची मुदत संपल्याने शिल्लक असलेल्या २१पैकी अनेक ग्रामपंचायतींचे कामकाज प्रशासकामार्फत चालविले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. या २१ ग्रामपंचायतींमध्ये कापडे बुद्रुक, सडवली, माटवण, मोरगिरी, कुडपण बुद्रुक, सवाद, देवळे, देवपूर, मोरसडे, महालगूर, चरई, बोरज, वाकण, कोंढवी, धारवली, आडावळे बुद्रुक, काटेतळी, पळचिल, बोरावळे, महाळुंगे, गोवेले आदींचा समावेश आहे. पावसाळ्यानंतर निवडणुकांची धामधूम अधिक असण्याची शक्यता निर्माण होणार आहे.

देशमुख मराठा समाज मंडळातर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

चौक : प्रतिनिधी

देशमुख मराठा समाज मंडळ खालापूर तालुका यांच्या वतीने इ. दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ श्रीराम मंगल कार्यालय चंद्रविलास येथे उत्साहात झाला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवव्याख्याते प्रशांत देशमुख होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देशमुख मराठा समाज मंडळ खालापूर तालुका अध्यक्ष प्रभाकरराव देशमुख होते. विद्यार्थ्यांचा गुणगौरव केल्याने त्यांच्यात आत्मविश्वास व शैक्षणिक ऊर्जा निर्माण होते आणि पुढील शैक्षणिक काळ सहज आणि सोपा जातो, असे प्रतिपादन शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी केले. वसंत मेमोरियल स्कूलचे अध्यक्ष उल्हासराव देशमुख व विलास देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून, कार्याध्यक्ष राम देशमुख, विनायक देशमुख उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना जय शिवराय पुस्तकाबरोबर सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देण्यात आले.

सुराज्याचे नियोजित आपत्ती व्यवस्थापन

कोकणाला लाभलेला समुद्रकिनारा आणि डोंगररांगांमुळे कोकणात सर्वाधिक पावसाची नोंद होते. त्यामुळे कोकणाला मोठ्या प्रमाणात नैसर्गिक आपत्तीचा सामना ही करावा लागतो. कोकण विभागात एकूण सात जिल्हे असून ५० तालुके आणि सहा हजार ३५३ गावे आहेत. राज्यातील सर्वाधिक म्हणजे सरासरी दोन हजार ते तीन हजार ३६८ मिमी पाऊस हा कोकणात पडतो. विशेषत: मुंबई व ठाणे जिल्ह्यात कमी कालावधीत जास्त पाऊस आणि भरतीची वेळ एकच असल्यास पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. कोकण विभागात एकूण ३७१ पूरप्रवण व २२३ दरड्ग्रस्त गावे आहेत.

नैसर्गिक आपत्तीच्या घटनांचा सामना करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन आणि जनजागृती हे महत्त्वाचे उपाय आहेत. यंदाच्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी पूर्वतयारी केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईसह संपूर्ण कोकणातील आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा घेतला. दरवर्षीप्रमाणे मुंबईची तुंबई होऊ नये यासाठी मुंबईतील पश्चिम उपनगरांतील नालेसफाईची मुख्यमंत्री महोदयांनी स्वतः पाहणी केली. एके ठिकाणी मुख्यमंत्री स्वतः नाल्याच्या पात्रात उतरले आणि त्यांनी कामाची पाहणी करीत सफाई कर्मचाऱ्यांशी संवाद देखील साधला. एनडीआरएफ कंपन्या राज्यात प्रत्येक ठिकाणी आपत्तीमध्ये वेळेत पोहचू शकत नाहीत, यासाठी सातही विभागात राज्य आपत्ती प्रतिसाद दले नेमण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. सध्या एनडीआरएफच्या दोन तुकड्या धुळे आणि नागपूर येथे आहेत. ठाणे येथे महानगरपालिकेने आपत्ती प्रतिसादासाठी वेळेत धाऊन जाणारे दल तयार केले असून, त्यांनी विशेषत: इमारत दुर्घटनांमध्ये उत्तम काम केलेले आहे. ज्या ठिकाणी उंच इमारती आहेत तसेच आपत्तींची शक्यता जास्त आहे अशा ठिकाणी नगरपालिकांना आपली बचाव दले तयार करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

कोकणात वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने तीन हजार २०० कोटी रुपये विविध आपत्ती निवारण कामे करण्यासाठी मंजूर केले आहेत. यामध्ये भूमिगत वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, बहुउद्देशीय चक्रीवादळामधले आसरे बांधणे, दरडी प्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाय, वीज अटकाव यंत्रणा यांचा समावेश आहे. राज्यभरातील २० पूरप्रवण जिल्ह्यांमध्ये एकूण सात हजार ९०० आपदामित्रांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

एकवेळ मालमत्तेचे नुकसान भरून काढता येते, पण जीवितहानी झाल्याने झालेले नुकसान कितीही मदत निधी देऊन भरून काढता येत नाही. या पावसाळ्यात आपत्तीमुळे जिवीतहानी होऊ नये यासाठी प्रशासनासोबत जनतेनेही दक्ष राहणे गरजेचे आहे. शोधमोहीम, बचाव आणि सुटकेसाठी प्रशासनामार्फत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची तयारी करण्यात आली आहे. आपत्तीच्या काळात सर्व अधिकाऱ्यांनी चोवीस तास फोन सुरू ठेवावेत. आपत्तीवर मात करण्यासाठी जिल्हा, विभाग ते राज्यस्तरीय सर्व यंत्रणांतील अधिकाऱ्यांनी उत्तम संपर्क आणि समन्वय राखावा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. आपत्ती प्रवण भागाचे आधुनिक तंत्रज्ञानाने डिजीटल मॅपिंग, प्रतिसाद, शोध, बचाव आणि सुटका यासाठी आधुनिक तंत्रज्ञान उपकरणांची मदत, यापूर्वी झालेल्या भूस्खलन भागातील नागरिकांशी संवाद, पुन्हा काही लोक त्या भागात रहिवासासाठी गेले असतील, तर त्यांची माहिती घेणे कारण भूस्खलन, दरडी आणि जमीनीच्या अनुषंगाने होणाऱ्या हालचाली या भागातील नागरिकांना चांगल्याप्रकारे माहित असतात. त्याबाबत त्यांच्याशी संवाद साधून त्यांचे स्थलांतर आणि पुनर्वसनाबाबत तयारी करण्याचे आदेश प्रशासनाकडून संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. बहुउद्देशीय सभागृहे, शाळा किंवा तत्सम निवारे उपलब्धता याबाबत पूर्वतयारी करण्यात आली आहे. अशा ठिकाणी आवश्यक अन्नधान्य तसेच औषधांचासाठा याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. पुरामुळे संपर्क तुटणाऱ्या गावात आतापासूनच औषधांचा पुरेसा पुरवठा करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र याठिकाणी तयारी ठेवण्यात आली आहे. वीजपुरवठा सुरळीत राहिल यासाठी महावितरणाच्या अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. एनडीआरएफ, एसडीआरफशी संपर्क–समन्वय राखणे, हवामान खात्याकडून दिल्या जाणाऱ्या इशाऱ्यांबाबत सतर्क राहणे, जीवरक्षकांची आवश्यकता भासल्यास त्यांची मानधन तत्त्वावर नेमणूक करणे यासर्व गोष्टींसाठी संबंधित यंत्रणांना आदेश देण्यात आले आहेत.

> ***नैसर्गिक आपत्ती, मानवी घटनेविना घडणाऱ्या अशा घटना आहेत ज्यांचा सर्व सजीवांवर नकारात्मक परिणाम होतो. नैसर्गिक आपत्तीची अनेक कारणे आहेत. निसर्गाच्या विरूद्ध दिशेने वाटचाल केल्याने नैसर्गिक आपत्ती उद्भवते. जेव्हा ही कृती टोकापर्यंत पोहचते तेव्हा या घटनांना आपत्ती मानले जाते. हवामानासंबंधी नैसर्गिक आपत्तींमध्ये उष्णकटिबंधीय चक्रीवादळ, पूर, दुष्काळ, वन्य अग्नी, चक्रीवादळ, उष्णतेच्या लाटा आणि शीतलहरी यांचा समावेश आहे, नैसर्गिक आपत्ती या अनिश्चित असतात. नैसर्गिक आपत्ती ही एक अतिशय भयंकर आणि धोकादायक घटना आहे.***

नैसर्गिक आपत्तीची माहिती असणाऱ्या व्यक्तींनी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाशी समन्वय साधण्यात येत आहे. तसेच पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तीमध्ये सुरक्षा व्यवस्था कशी ठेवण्यात यावी त्यादृष्टीने जिल्हास्तरापासून ग्रामपातळीपर्यंत आराखड्याचानुसार उपाययोजना करण्यात येत आहेत. आपत्ती व्यवस्थापनामध्ये स्थानिक पातळी ही देखील महत्त्वाची आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या वतीने जिल्हास्तरावर जिल्हा आपत्ती आराखडा तयार करणे तो अद्यावत करणे, विविध कार्यशाळा आयोजित करणे तसेच रंगीत तालीम आदी उपक्रम जिल्हा व तालुका पातळीवरील कार्यक्रमात राबविण्यात येतात. गाव आपत्ती व्यवस्थापन समिती आदी सदस्यांचे प्रशिक्षण, कार्यालयीन कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे कर्मचारी यांचे प्रशिक्षण तसेच लोकसहभाग वाढविण्यासाठी पथनाट्य, जाहिरात फलक, पोस्टर्स स्पर्धा आदी कार्यक्रमांद्वारे जनजागृती करण्यात येते.

निर्माण होणारी संभाव्य परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. याशिवाय पूरपरिस्थीतीमुळे साथ रोगांना नियंत्रित ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणा, विद्युत पुरवठा सुरळित ठेवण्यासाठी महावितरण कंपनी, दूरध्वनी सेवा सुस्थितीत ठेवण्यासाठी दुरसंचार विभाग, रस्त्यांने वाहतूकीचा संपर्क असावा यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य परिवहन महामंडळ, पाटबंधारे विभाग व इतर संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेसोबतच शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी, होमगार्ड्स, पोलीस प्रशासन, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आदींचा प्रामुख्याने सहभाग असतो, तसेच आपतकालीन परिस्थितीमध्ये ग्रामस्थांनी देखील हिरिरीने पुढाकार घेऊन सुरक्षा व्यवस्थेला सहकार्य करण्याची गरज आहे.

धरणांच्या पाणी साठा विसर्गाचे योग्य नियोजन :

पावसाळ्यात धरणांमधून होणारा पाण्याचा विसर्ग हा नेहमीच महत्वाचा मुद्दा असतो. पूर नियंत्रण जलसंपदा विभागाचे अधिकारी नियोजनाने व्यवस्थितरित्या पार पाडू शकतात. त्यादृष्टीने संबंधित अभियंत्यांनी या काळात कोणत्याही परिस्थितीत धरणाच्या जागेवरच राहावे आणि मुख्य अभियंता यांच्या परवानगीशिवाय अजिबात मुख्यालय सोडू नये, असे निर्देश मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी नुकत्याच झालेल्या मान्सूनपूर्व आढावा बैठकीत दिले आहेत. पूर नियंत्रणाच्या दृष्टीने धरणातून किती पाणी कसे सोडण्यात येत आहे ते सर्वसामान्यांना रियल टाईम कळावे म्हणून जलसंपदा विभागाने यंत्रणा विकसित केली असून, त्याद्वारे धरण क्षेत्रातील परिसरातील नागरिकांना आगाऊ सूचनाही मिळणार आहेत.

कोकण विभागात ठाणे जिल्ह्यातील भातसा, बारवी, तानसा व मोडकसागर अशी मोठी चार, पालघर जिल्ह्यजील सूर्या–धामणी, वांद्री–पालघर, कुर्जे–डहाणू अशी मोठी तीन, रायगड जिल्ह्यातील हेटवणी, भीरा व डोलवहाल असे मोठे दोन लघु प्रकल्प २८, रत्नागिरी जिल्ह्यात मोठे दोन लघु प्रकल्प ४६, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील तिलारी हे मोठे, एक मध्यम प्रकल्प, एक लघु प्रकल्प २३ असे एकूण मोठे १०, मध्यम तीन आणि लघु प्रकल्प ९७ आहेत.

या धरणांच्या पाणी साठा विसर्गाचे योग्य नियोजन करण्यात आले आहे. कोकण विभागात आपत्ती झाल्यास कृपया पुढील क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

–प्रविण डोंगरदिवे, माहिती सहाय्यक, विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई

विभागीय आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष

✻ कोकण भवन, नवी मुंबई	– ०२२–२७५७१५१६
✻ मुंबई शहर	– ०२२–२६६४२३२/८६५७१०६२७३
✻ मुंबई उपनगर	– ०२२–६९४०३३४४
✻ ठाणे	–०२२–२५३०१७४०/२५३८१८८६
✻ पालघर	–०२५२५–२९९३५३/८२३७९७८८७३
✻ रायगड	–०२१४१–२२२११८/८२७५१५२३६३
✻ रत्नागिरी	– ०२३५२–२२२२३३/२२६२४८
✻ सिंधुदुर्ग	–०२३६२–२२८८४७/७४९८०६७८३५

कर्जत आदिवासी ठाकूर संघटनेच्या वतीने वृक्षलागवड

कर्जत : प्रतिनिधी

कर्जत तालुका आदिवासी ठाकूर समाज संघटनेच्या वतीने अंबेवाडी नेरळ येथे वृक्षलागवड करण्यात आली.

शासनाच्या वतीने दरवर्षी १ ते ७ जुलैपर्यंत वनमहोत्सव आयोजित करण्यात येतो. त्यानिमित्त आदिवासी ठाकूर समाज संघटनेचे अध्यक्ष परशुराम दरवडा यांच्या नियोजनातून वृक्षलागवड बुधवारी (दि. ५) आंबेवाडी नेरळ येथे करण्यात आली. वनविभागाकडून रोपे उपलब्ध करण्यात आली.

या वेळी संघटनेचे अध्यक्ष परशुराम दरवडा, महिलाध्यक्षा जयवंती हिंदोळा, नेरळ सरपंच उषा पारधी, वन अधिकारी म्हात्रे, जिल्हा खजिनदार दत्तात्रेय निरगुडा, संघटनेचे सचिव भगवान भगत, नेरळ ग्रामपंचायत सदस्य नितीन निरगुडा, सदा शिंगवा, वनसमिती नेरळ अध्यक्ष मधुकर शिंगवा, जोमा निरगुडा, राजु झुगरे, सोमा निरगुड़ा, देहू दरवडा, गोमा निरगुड़ा, कृष्णा पारधी, हरीचंद्र फसाळी, परशुराम निरगुड़ा, बाळू दरवड, प्रकाश कडाळी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

विंडीजविरुद्ध टी-२० मालिका

टीम इंडियात नव्या चेहऱ्यांना संधी

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) वेस्ट इंडिजविरुद्ध पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा केली असून स्टार फलंदाज विराट कोहली आणि फॉर्ममध्ये नसलेला रोहित शर्मा यांना विश्रांती दिली आहे. यशस्वी जैस्वाल, तिलक वर्मा आणि मुकेश कुमार यांसारख्या नवख्या खेळाडूंना संघात संधी देण्यात आली आहे. संघाचे कर्णधारपद हार्दिक पांड्याकडे, तर सूर्यकुमार यादवला उपकर्णधारपद देण्यात आले आहे. याशिवाय रवी बिश्नोई आणि आवेश खान यांचे संघात पुनरागमन झाले आहे.

माजी क्रिकेटर अजित आगरकर यांची बीसीसीआयच्या मुख्य निवडकर्ता पदी नियुक्ती झाल्यानंतर

अवघ्या २४ तासांत संघ जाहीर करण्यात आला. केएल राहुल आणि ऋषभ पंतच्या दुखापतीमुळे संजू सॅमसनला संघात संधी देण्यात आली आहे. दुसरीकडे, अर्शदीप सिंग आणि उमरान मलिक यांचीही निवड झाली आहे, पण विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना मात्र संघात स्थान मिळाले नाही.

गेल्या महिन्यात ओव्हल येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध 'वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप'च्या अंतिम सामन्यात भारताचा पराभव झाला होता.

असा आहे संघ

इशान किशन (विकेटकीपर), शुबमन गिल, यशस्वी जैस्वाल, तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव (उपकर्णधार), संजू सॅमसन (विकेटकीपर), हार्दिक पंड्या (कर्णधार), अक्षर पटेल, युझवेंद्र चहल, कुलदीप यादव, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, उमरान मलिक, आवेश खान, मुकेश कुमार.

त्यानंतर बीसीसीआयने भारतीय कसोटी संघात काही नवीन चेहऱ्यांना संधी दिली. अनुभवी फलंदाज चेतेश्वर पुजाराला संघातून वगळण्यात आले, तर यशस्वी जैस्वाल आणि ऋतुराज गायकवाड यांचा संघात समावेश करण्यात आला होता. आता टी-२० संघातही बदल दिसत आहेत.

आगरकर यांचे इरादे स्पष्ट

निवड समितीचे अध्यक्षपद स्वीकारल्यावर अजित आगरकर यांनी पहिल्याच बैठकीत रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यासह पाच जणांना संघाबाहेर केले आहे. रोहित, विराटव्यतिक्त अष्टपैलू रवींद्र जडेजा, वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आणि आयपीएलमध्ये दमदार धावा करणाऱ्या ऋतुराज गायकवाडलाही स्थान देण्यात आले नाही.

बांगलादेशचा कर्णधार तमिम इक्बालची तडकाफडकी निवृत्ती

ढाका : वृत्तसंस्था

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा यंदा ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये भारतीय भूमीवर खेळवला जाणार आहे. यापूर्वी बांगलादेश क्रिकेटमध्ये एक मोठा भूकंप झाला असून वनडे संघाचा कर्णधार तमिम इक्बालने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली आहे.

बांगलादेश संघाचा अनुभवी डावखुरा सलामीवीर फलंदाज तमीम इक्बाल याने भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या अवघ्या तीन महिन्यांपूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्तीची घोषणा करून सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. ३४ वर्षीय तमिमने पत्रकार परिषदेत सर्वांना आपल्या निर्णयाची माहिती दिली. बांगलादेश संघाच्या वनडे कर्णधाराने जेव्हा आपला निर्णय जाहीर केला तेव्हा तोही खूप भावूक झाला होता. त्याच्या या तडकाफडकी निवृत्तीमुळे बांगलादेशच्या संघावर खूप मोठा परिणाम होणार आहे.

रायगड जिल्हा तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात

मोहोपाडा : प्रतिनिधी

अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगड आणि गुरुकुल तायक्वांदो अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा नुकतीच वीर तायक्वांदो अकॅडमीकडून उत्साहात पार पडली. या स्पर्धेत कॅडेट व ज्युनिअर वयोगटातील क्योरुगी व पुमसे प्रकारातील विविध गटांसाठी जिल्ह्यातील तायक्वांदोपटूंनी आपले कसब अजमावले.

कॅडेटमध्ये राज जाधव व श्रावणी पाटणे यांना, तर ज्युनिअर गटात साईराज पाटील व संस्कृती पाटील यांना अनुक्रमे 'उत्कृष्ट खेळाडू' मुले व मुली असे पुरस्कार मिळाले. गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीने १५ क्योरुगी गटांत व १० पुमसे गटांत सुवर्णपदकांसह सांघिक विजेतेपद पटकाविले, तर वीर तायक्वांदो अकॅडमी व अटॅकर्स तायक्वांदो अकॅडमी यांनी सहा व सहा सुवर्णपदकांसह अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू महाराष्ट्र राज्य तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगडच्या अध्यक्ष अॅड. प्रज्ञा भगत, सचिव सचिन माळी, खजिनदार व स्पर्धेचे आयोजक रोहित सिनलकर आदींनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत मेदवेदेव, श्वीऑनटेकची आगेकूच

विम्बल्डन : वृत्तसंस्था

तिसरा मानांकित डॅनिल मेदवेदेव, ब्रिटनच्या कॅमेरून नॉरी, अमेरिकचा फ्रान्सिस टियाफो व बल्गेरियाचा ग्रिगोर दिमित्रोव्ह यांनी विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत आपापल्या पुरुष एकेरीच्या सामन्यात विजय मिळवत आगेकूच केली. महिला एकेरीत अग्रमानांकित पोलंडच्या इगा श्वीऑनटेकने सहज विजय नोंदवला. युक्रेनच्या मार्टा कोस्त्युकने ग्रीसच्या आठव्या मानांकित मारिया सक्कारीला नमवत धक्कादायक निकालाची नोंद केली.

गटातील अन्य सामन्यात दारिया कसात्किनाने विजय नोंदवत तिसरी फेरी गाठली, तर अमेरिकेची स्लोन स्टीफन्स व इस्टोनियाच्या ॲना कोंटावेइटने आपापले सामने जिंकले.

जेतेपदाच्या प्रबळ दावेदारांपैकी एक असलेल्या मेदवेदेवने ब्रिटनच्या आर्थर फेरीवर ७-५, ६-४, ६-३ असा विजय नोंदवला. पहिल्या सेटमध्ये मेदवेदेवला आर्थरने आव्हान दिले, मात्र सेट जिंकत त्याने चांगली सुरुवात केली. आपली हीच लय पुढच्या दोन सेटमध्ये कायम राखताना विजय निश्चित केला.

पीएसएलमधील संघमालकाची आत्महत्या

इस्लामाबाद : वृत्तसंस्था

पाकिस्तान सुपर लीगमधील मुलतान सुलतान संघाचा मालक आलमगिर खान तरीन यांनी आत्महत्या केली आहे. स्थानिक मीडियाच्या वृत्तानुसार आलमगिर यांनी स्वतःच्याच पिस्तुलातून डोक्यावर गोळी घातली.

२०१७मध्ये मुलतान सुलतान संघ तयार झाला. पदार्पणाच्या हंगामात त्यांना काही खास करता आले नाही. लीगची वार्षिक फी भरू न शकल्याने या फ्रँचायझीसोबतचा करार मोडला गेला होता. डिसेंबर २०१८मध्ये आलमगिर आणि अली खान तारीन हे या फ्रँचायझीचे नवे मालक बनले. २०२१मध्ये आलमगिर यांनी फ्रँचायझीचे सर्व शेअर आपल्या ताब्यात घेतले आणि त्याच वर्षी संघाने जेतेपद जिंकले होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com